जकातीची माफी, १० जिलकाद, सु. १२१४/४ नोव्हें. १८१३ (१८२६८); बाळाजीपंत यांच्याकडून जामदारखान्याची हिशेब तपासणी, शिंदे शृंगीपूर येथे गेले त्यावेळी इंग्रजांनी जो खर्च केला त्याची बावांपासून घेतलेली वसुली, नागपुराबाहेर भोसल्यांचे डेरे व ते जेजुरीस जाणार असल्याची बातमी, लोकांना वाड्यांत येण्याची मनाई, २६ ज. खर, सु. १२१४/२६ जून १८१३ (१८२६९); बाळोजी कुंजीर याच्याशी कामासंबंधी चर्चा, रामदिन व अंबाजी सखाराम यांचा मुराराव यांच्याकडून पराभव, २१ सवाल, सु. १२१४/१७ ऑक्टो. १८१३ (१८२७०); मल्हार भीमाजी बक्षी याजकडून पठाण लोकांना खर्चासाठी पैशाची आदाई, रामराव फाळके यांची पिछोरा येथे मोर्चेबंदी व रणधीरसिंग भरतपूरवाले यांचा पिछोर ताब्यांत देण्यास तयार असल्याबद्दल निरोप, १ सवाल, सु. १२१४/२७ सप्टें. १८१३ (१८२७१); मोर्चेबंदी केल्याबद्दल पिछोऱ्याहून रामराव फाळके यांचे पत्र, कबूल केल्याप्रमाणे सरंजाम लावून देण्याची सदाशिवपंत व बाळाजी सिद्धेश्वर यांची विनंती, आंबाजी सखाराम व रामदीन यांची मुराराव पवार यांचेशी लढाई होणार असल्याचे वर्तमान, ३ सवाल, सु. १२१४/२९ सप्टें. १८१३ (१८२७२); खटके यांचे पागेस व इतर लोकांना ऐवज देण्यास मंजुरी, गोपाळराव रघुनाथ व रामचंद्र बाजी निा भुसकुटे यांचेबरोबर खलबत, छितू पेंढारी यांचे जगन्नाथ राम यांचे फौजेतून बहिर्गमन, डाकेचा कारकून आनंदराव यास अटक, ४ ज. खर, सु. १२१४/२५ मे १८१४ (१८२७३); चिंचवडकर देव यांचे गांवी पर्वतावर शनीच्या स्थानी शनीस अभिषेक व ब्राह्मणांस दक्षिणा, माधवराव तोफखानेवाले यांस तोफांचे छेरे करावयाची आज्ञा, आग्र्याहून खरबुजांची रवानगी, ३० ज. वल, सु. १२१४/२१ मे १८१४ (१८२७४); गोकुळ पारख याजकडून गोपाळराव रघुनाथ, रामचंद्र भास्कर, बाबाजी पाटणकर ह्यांना लष्करांतून काढून देण्याचा प्रयत्न व त्याच्याकडील लोक नर्मदातीरीच्या श्रीमंताच्या छावणीत जाण्याचा संभव, कोट्याच्या गढीवरील ताबा सोडीत असल्याबद्दलचा पत्रांतील मजकूर, ज्यानबत्तीस कर्णेल याच्या व श्रीमंताच्या फौजेच्या हालचाली कळविण्याची ज्यानबत्तीस यास आज्ञा, १ ज. खर, सु. १२१४/२२ मे १८१४ (१८२७५); रामराव फाळके यांनी पिछोऱ्याहून हल्ला केल्याचे वर्तमान, जालवण दतिया येथील नुकसानभरपाईची इस्तरेची साहेबाच्या मुन्शीकडून मागणी, ४ सवाल, सु. १२१४/३० सप्टेंबर १८१३ (१८२७६); पलटणाचे खर्चास देण्यासाठी जेकम याच्याकडून विनंती, गोपाळराव रघुनाथ याजबरोबर खलबत, कोटेवाल्याकडून पंख्यांची भेट, २ ज. खर, सु. १२१४/२३ मे १८१४ (१८२७७); सखाराम घाटगे याच्या मृत्युमुळे दौलतराव शिंदे व मानाजी फाकडे यांचे असलेले वैमनस्य जाऊन सख्य झाल्याबद्दल, हिंदुराव घाटगे यांचे बायजाबाईस पत्र, देवरी येथे दारू उडाल्यामुळे काही माणसांचा मृत्यू, २९ ज. वल, सु. १२१४/२० मे १८१४ (१८२७८); बाळा चोपदार व मखुबेग यांजकडून तळ्याची पाहणी, त्रिंबकराव दाभाडे यांचे आगमन व त्यांच्याशी खलबत, इंग्रजांच्या वकीलाचे सेवडे येथून पिछोरा येथे गमन, २४ ज. वल, सु. १२१४/१५ मे १८१४ (१८२७९); नाईकराव पाटणकर यांचे खर्चाकरिता वाड्यांत धरणे, हैदराबादचा नबाब याजकडील सुभानखान याचा जळगाव जांबुदावर मुक्काम, चमेलीवर होळकर यांच्या फौजेस झालेल्या तापाच्या उपद्रवामुळे ती भानपुऱ्या येथे येणार असल्याबद्दल, २५ ज. वल, सु. १२१४/१६ मे १८१४ (१८२८०); फौजेचे काम रामचंद्र भास्कर यास सांगण्याबाबत, बाबुराव आंग्रे यांच्या स्त्रीने घ्यावयाच्या दत्तकासंबंधी हिंदुराव घाटगे यांचे पत्र, ६ सवाल, सु. १२१४/२ ऑक्टो. १८१३ (१८२८१); दुर्गाबाई यांचे चितेतून सुतासुद्धा मंगळसुत्र निघाल्याबद्दल, गोपाळराव रघुनाथ, रामचंद्र भास्कर यांच्याशी खलबत, २५ र. खर/इ. स. १८१३–१८१८ (१८२८२); हरणाच्या शिकारीस गमन, सोनबा भोसले याने ऐवजाकरिता बक्षीस अडविल्याबद्दल, ६ र. खर, सु. १२१४/२९ मार्च १८१४ (१८२८३); गोपाळराव रघुनाथ व दरकदार यांच्यामध्ये मुखत्यारीच्या वगैरे कामासंबंधी वाटणी, आंबाजी घाटगे, पाटणकर वगैरेंची कबजे प्रथम करून मग फौजेची कबजे करण्याचा ठराव, १३ जिलकाद, सु. १२१४/७ नोव्हें. १८१३ (१८२८४); आग्र्याहून पलटणे व किल्लेदार हे चमेलीतीरी येणार असल्याचे वर्तमान, भरतपूरावर लढाईचा इरादा, खडकसिंग याजबरोबर सुज्यालमुलक बादशहाचे लाहोर येथे आगमन, २४ सवाल, सु. १२१४/२० ऑक्टो. १८१३ (१८२८५); पेंढाऱ्यांच्या बंदोबस्ताबद्दल चर्चा, लोकांच्या खर्चाची तोड निघत नसल्याबद्दल बोलणे, १जिलकाद/इ. स. १८१३–१८१८ (१८२८६); खैराती घाटावर पूल बांधून उतरल्याची बातमी, रणजितसिंग शीख यांचे अमृतसर येथे आगमन, शाहाचे वजीराकडून सुभ्यास होणाऱ्या उपद्रवाच्या बंदोबस्तास फौज

पत्रे : चालू—

पाठविण्याबद्दल काश्मिरचा जमीनदार इमामखान याचे रणजितसिंग यास पत्र, भगवंतराव व रामराव फाळके यांचे कोटानजीक मोर्चे, माधवराव भद्र यास सरदारीचीं वस्त्रें, ६ जिलकाद, सु. १२१४/२१ ऑक्टो. १८१३ (१८२८७) ; माचेडीचा रावराजा याचे मुलुखांतील गावांची लूट, महमदशाहा खंदारची फौज घेऊन पिसोऱ्यास आले असून पुढे अटकेस जाणार असल्याची बातमी, महाल सोडवून घेण्याविषयी मुरारराव याचे जालमसिंग यास पत्र, रामदीन महीपार गेल्यावर पवार याचा छापा व गुजराथहून येणाऱ्या फौजेबरोबर लढाई, यशवंतराव शिवजी व आंबाजी सखाराम होळकर यांच्यातील लढाई, ८ जिलकाद, सु. १२१४/२ नोव्हें. १८१३ (१८२८८) ; आनंदराव शिंदे यांचे श्राद्ध, ब्राह्मणांस दानधर्म, बाईचे भेटीस स्वारीबरोबर जाण्याकरिता मानकऱ्यांना ताकीद, २५ र. वल/इ. स. १८१३–१८१८ (१८२८९) ; मिर्जा रहीमबेग याची जहागीर, ज्यानबत्तीस याचा गडेकोटचास अंमल, माळव्यांत शिंदे होळकर याजकडील लोकांचा व गिरांशांचा दंगा, ५ रजब, सु. १२१४/४ जुलै १८१३ (१८२९०) ; मिर्जा असदअली याजकडून नरवर येथील अंमल काढून नुरा कुंजडा यास दिल्याबद्दल, इंग्रजांची पलटणे भांडेरी येथील रानांत छावणीस येणार असल्याचे वर्तमान, ६ रजब, सु. १२१४/५ जुलै १८१३ (१८२९१) ; जेकम साहेब यास पुत्र झाल्याबद्दल आहेर, मणिराम शेट याच्याशी खर्चासंबंधी चर्चा, पाटणकर यांना उर्जिताचे आश्वासन, जेकम साहेब याची खर्चास देण्याबद्दल विनंती, १२ ज. खर, सु. १२१४/२ जून १८१४ (१८२९२) ; भेलसे प्रांती पेंढाऱ्यांनी खराबी केली म्हणून हिरा पेंढारी व कुवर लेकावले यांस तेथून निघून जाण्याबद्दल ताकीद, पेंढाऱ्यांकडून सुज्यालपूर येथील लूट व कृष्णराव याचा पाठलाग, रामदीन याचा मुरारराव पवार याजकडून पराभव, १३ सवाल, सु. १२१४/९ ऑक्टो. १८१३ (१८२९३) ; मूर्तजाखान पठाण यास अटकाव, झाशीत भिकाऱ्यांचा हलवायांची दुकाने लुटून दंगा, रणजितसिंग शिखाने महंमदशा यास चाकरी दिल्याबद्दल, गणपतराव नारायण याजकडे होळकर यांचेकडील कारभार, ८ रमजान, सु. १२१४/४ सप्टें. १८१३ (१८२९४) ; मूर्तजाखान पठाण व बक्षी यांच्या भांडणात आबाजी घाटगे याच्या भावाचा हस्तक्षेप, कोटचाच्या राजाच्या महालांत धामधूम करू नये म्हणून बापू शिंदे यास ताकीद, ५ रमजान, सु. १२१४/१ सप्ट. १८१३ (१८२९५) ; चव्हाण यांचे ऐवजासाठीं धरणे, मल्हारगडचा ताबा देण्याबद्दल होळकर यांना पत्र, नारायणराव जिवाजी याचे चिरंजीव भुपालास जगन्नाथराम यांचे फौजेत येणार असल्याची बातमी, १९ ज. वल, सु. १२१४/१० मे १८१४ (१८२९६) ; त्रिंबकराव व चिमणाबाई दाभाडे यांचे खर्चाकरितां उपोषण व त्यांच्या खर्चाचा बंदोबस्त, २४ रमजान, सु. १२१४/२० सप्टें. १८१३ (१८२९७) ; जेकम साहब यास त्रिंबकराव दाभाडे यांच्या खर्चाचा बंदोबस्त झाल्यावर ऐवज देण्याचे आश्वासन, मीरखान याजकडील ठाण्याबद्दल, १८ सवाल, सु. १२१४/१४ ऑक्टो. १८१३ (१८२९९) ; रामराव फाळके याजबरोबर जेकम साहेब याची पलटणे चमेली येथील रांगडचाच्या गढयाखालीं करण्यासाठीं रवाना, ४ रजब, सु. १२१४/३ जुलै १८१३ (१८३००).

पुडके क्रमांक ३

का. सं. ६० (१८३०२–१८३६१), सु. स. १२१२–१२१९, इ. स. १८११–१८१९.

बातमीपत्रे : **(दोलतराव शिंदे याजकडील)**

(फक्त प्रेषकांचा नामोल्लेख असलेली)

कृष्णाजी नाईक गायकवाड—(–): भगवंतराव याजकडून जालवण, झांशी, दतिया महालांना झालेल्या नुकसानभरपाईची इंग्रजांकडून मागणी, २० रजब, सु. १२१४/१९ जुलै १८१३ (१८३०२) ; सरकारी माणसाव्यतिरिक्त माणसास आंत येण्यास मनाई, नुरा कुंजडा याजकडून आगरा येथील महताबा प्रविष्ठ, २१ रजब, सु. १२१४/२० जुलै १८१३ (१८३०३) ; ज्यानबतीस याच्या पुत्राच्या लग्नाप्रित्यर्थ आहेर रवाना, यशवंतराव दाभाडे यांचे ब्रम्हावर्तास गंगास्नानास गमन, २२ मोहरम, सु. १२१४/१५ जानेवारी १८१४ (१८३०४) ; होळकर याजकडून महालांस झालेल्या उपद्रवाबद्दल जालीमसिंग याचे पत्र प्रविष्ट, महंमदशहा याजकडून संमदखानाची शीखांकडे जाबसालास रवानगी, जयपूरवाले यांजकडून मीरखान याची खंडणी वसुली, सुज्यातअली याजकडून रणजितसिंग

बातमीपत्रे : चालू—

यास जवाहीर व अटकेचा किल्ला नजर, १२ रजब, सु. १२१४/११ जुलै १८१३ (१८३०५) ;
नुरा कुंजडा याची बाजारच्या कामावर सरकारकडून नेमणूक व त्याबाबत नुरा कुंजडा याची
सरकारांत विनंती, डाकेच्या व्यवस्थेबद्दल बाळा चोपदार यास चिटणिसाची ताकीद, २४ रजब,
सु. १२१४/२३ जुलै १८१३ (१८३०६) ; मोरो हरी याची निंबाळकर यांचेकडे चोपड येथील
सोडचिठ्ठीची मागणी, महंमदशहा बादशहा याच्या वजिरास फितुरीची पत्रे लिहिल्याबद्दल देवीसिंग
मुनशी यास दानसिंग याजकडून कैद, इंग्रजांच्या मदतीने शिखांशी लढण्याच्या बादशहाच्या बेताबद्दल
दानसिंग याचे रणजितसिंग यास पत्र गेल्यावरून रणजितसिंग याची लढाईची तयारी, २५ रजब,
सु. १२१४/२४ जुलै १८१३ (१८३०७) ; मुसाबसिंग व डाकवाला याचा मृत्यू, रणजितसिंग
याचा पुत्र खडकसिंग याजकडून वजिराचा पराभव, पिसोरा येथून खडकसिंग याच्याशी युद्ध करण्यास
आलेल्या बादशहाचे पारिपत्य करण्यासाठी रणजितसिंग याचे सुज्यावलमुलुक याच्यासह लाहोर
येथून अटकेस गमन, २५ रजब, सु. १२१४/२४ जुलै १८१३ (१८३०८) ; गंगाधर जोशी याज-
कडील इनाम गांवांच्या जप्तीची सोडचिठ्ठी, २५ रजब, सु. १२१४/२४ जुलै १८१३ (१८३०९) ;
बाळोजी इंगळे याजकडे अजमेर देण्याचा तात्या शिंदे यांचा विचार, गडकोटावर ज्यानबत्तीस याचा
कबजा व राघोगडावर चाल, २५ रजब, सु. १२१४/२४ जुलै १८१३ (१८३१०) ; दानधर्म व
जगदेवराव निंबाळकर याच्याशी खलबत, २५ रजब, सु. १२१४/२४ जुलै १८१३ (१८३११) ;
चमेली येथील मामलतीबद्दल कमाविसदाराशी जाबसाल, ४ रजब, सु. १२१५/२३ जून १८१४
(१८३१२) ; शिकारीचेवेळी गोळी वाजवल्याबद्दल गावढ्याचे जमीनदारांस करावयाच्या
शिक्षेसंबंधी चर्चा, महेताबखां सुभे याची चवमुहेवाल्याच्या लढाईत फत्ते, १३ ज. वल, सु. १२१४/४ मे
१८१४ (१८३१३) ; सरकारच्या ऐवजाबद्दल पारख व बाळारामशेट यांचेशी जाबसाल, झांशीजव-
ळील मोहोबा जिल्ह्यांत चिरोली किल्यावर इंग्रजांचा कबजा, २२ मोहरम, सु. १२१४/१४ जानेवारी
१८१४ (१८३१४) ; रेवडीच्या इंग्रजी पलटणांकडून माचेडीकर यांच्या गावांची खराबी, मणी मांजरे
याच्या मुख्याकडून इंग्रजांचा पराभव, रामदिन याजकडून मुरारराव पवार यास कैद, १४ जिल्हेज,
सु. १२१४/८ डिसेंबर १८१३ (१८३१५) ; शिखांकडील दिवाण मोहकमसिंग याचा चिनादलीच्या
किल्यावर ताबा व शहाकडील किल्लेदाराचे पलायन, महादजी शिंदे याच्या स्त्रीचा उज्जैन येथे
मृत्यू, ३० मोहरम सु. १२१४/२३ जानेवारी १८१४ (१८३१६) ; माचेडी येथील रावराजे याचा
इंग्रजांकडून कृष्णगडाजवळ पराभव, २५ जिल्हेज, सु. १२१४/२३ डिसेंबर १८१३ (१८३१७) ;
पेंढाऱ्यांची बातमी, रामदिन याजकडून मुरारराव पवार यास गोदऱ्याचे गढीत कैद, रणजितसिंग
याचे चिनावद नदीवर आगमन, १४ जिल्हेज, सु. १२१४/८ डिसेंबर १८१३ (१८३१८) ;
ज्यानबत्तीस याचा चंदेरी येथून सोपाऱ्यास कूचाचा बेत, रेवडीची पलटणे कृष्णगडाजवळ असून
माचेडीवाल्याशी तह करण्यास इंग्रजांचा नकार, १४ जिल्हेज, सु. १२१४/८ डिसेंबर १८१३
(१८३१९) ; रेवडीकर पलटणांचा माचेडीकर रावराजाकडील तिजारा गढीवर ताबा, महंमद
शहा याच्या मुकाबल्यास रणजितसिंग याचे अटक येथे प्रयाण, बादशहाच्या वजिराशी मुकाबला
करण्यास रणजितसिंग याचा दिवाण मोहकमसिंग काश्मिरी रवाना, इंग्रजांचा काल्पी व कानपूर
येथील सरंजाम प्रयाग येथे पाठविण्याचा बेत, १४ जिल्हेज, सु. १२१४/८ डिसेंबर १८१३
(१८३२०) ; मुलतान घेऊन त्याचेऐवजी अटक महंमदशहा यास देण्याबद्दल फत्तेखां वजिराचा
रणजितसिंग याच्याशी झालेला जाबसाल, पेंढाऱ्यांच्या पारिपत्यास इंग्रज व सरकारी फौज रवाना,
१६ जिल्हेज, सु. १२१४/ १० डिसेंबर १८१३ (१८३२१) ; पौर्णिमेच्या वनभोजनास सेनापतीस
आमंत्रण, १० जिल्हेज, सु. १२१४/४ डिसेंबर १८१३ (१८३२२) ; आनंदराव शिंदे याचे श्राद्ध,
यशवंतराव दाभाडे यास बाईचे भेटीसंबंधी निरोप, शितू पेंढारी यास पत्र रवाना, १२ र. खर,
सु. १२१४/४ एप्रिल १८१४ (१८३२३) ; जयपूरमधील चवमुहेवाला यावर शिवलाल व
सुकलाल सुभे यांनी केलेल्या हल्यांत सुभ्यांचा पराभव, २२ र. खर, सु. १२१४/१४ एप्रिल १८१४
(१८३२४) ; जगदेवराव निंबाळकर याजकडे चोपड्याच्या सोडचिठ्ठीची मागणी, रणजितसिंग
याने बादशहाकडील जवाहीर नेल्याचे वर्तमान, बापू शिंदे यास ताकीद करण्याबद्दल जालमसिंग
कोटेकर दिवाण याचे पत्र रवाना, २२ र. खर, सु. १२१४/१४ एप्रिल १८१४ (१८३२५) ;
भगवंतराव सुभे व रायसिंग हवालदार याजकडील फौजेची व पागेची हजेरी, फौजेच्या खर्चाबद्दल
ज्यानबत्तीस याची विनंती, २२ र. खर, सु. १२१४/१४ एप्रिल १८१४ (१८३२६) ; यशवंतराव
दाभाडे याचे शिकारीस प्रयाण, माधवराव परांडे व बापू वाबळे याजकडील हजेरी, २२ र. खर,

बातमीपत्रे : चालू—

सु. १२१४/१४ एप्रिल १८१४ (१८३२७) ; आगरा येथील गोऱ्या किल्लेदाराचा मृत्यू, हिशेब पुरा करून नरवर येथे जाण्याचा नुरा कुंजडा यास आदेश, शितू व करीमखां पेंढारी यांची हांडिया येथे कटकट, मीरखान व कपूरखान याचे होळकर यांचेकडे गमन, ३० मोहरम, सु. १२१४/२३ जानेवारी १८१४ (१८३२८) ; मल्हार बक्षी याच्या खर्चाबद्दल पारख यांचेशी जाबसाल, जेकण याच्या ऐवजाबद्दल चर्चा, १६ जिल्हेज, सु. १२१४/१० डिसेंबर १८१३ (१८३२९) ; अंबाजी घाटगे यास खर्चाबद्दल लोकांचा तगादा, ज्यानबत्तीस याजकडील फौजेच्या खर्चाबद्दल दुर्गाप्रसाद याची विनंती, २५ जिल्हेज, सु. १२१४/२३ डिसेंबर १८१३ (१८३३०) ; परवानगीशिवाय कोणाला येऊ न देण्याची पहारेकऱ्यास ताकीद, फिरंग्याकडून दौलतराव शिंदे यास वाघ नजर, १५ साबान, सु. १२१४/१३ ऑगस्ट १८१३ (१८३३१) ; मंगरूळ, नरवर व बोरी महालांसंबंधी नुरा कुंजडा याची विनंती, ज्यानबत्तीस याचे चंदेरी येथे आगमन, २५ साबान, सु. १२१४/२३ ऑगस्ट १८१३ (१८३३२) ; महंमदशहा याचा सेवटे येथे मुक्काम, वजिराचे फौज आणण्यास गमन, मकू बेग याचे अटकेपार प्रयाण, रणजितसिंग याचा वजिराबाद येथे जाण्याचा बेत, हैदराबादचा नबाब व भोसले यांचा पुण्यास जाण्याचा बेत, २५ साबान, सु. १२१४/२३ ऑगस्ट १८१३ (१८३३३) ; शहाच्या लेकाचा अटक येथे मुक्काम, खंदारची फौज न आल्याचे वर्तमान, दयाराम मुनसी याची मुक्तता, मुगावली व सुरंजवाल्याच्या ठाण्यावर इंग्रजांचा कबजा, १५ साबान, सु. १२१४/१३ ऑगस्ट १८१३ (१८३३४) ; काश्मिरच्या लढाईत रणजितसिंग याचा कैदी झालेल्या शहाच्या बंधूच्या सुटकेबद्दल ऐवज वसुली, बोरीच्या हिशेबाबद्दल नुरा कुंजडा याची विनंती, २५ साबान, सु. १२१४/२३ ऑगस्ट १८१३ (१८३३५) ; मिरखान याचे टोंक्यास आगमन व जयपूरच्या मामलत्याचा ठराव, वजिराचे पलायनाची बातमी समजल्यावरून बादशहाकडून रयतेच्या समाधानासाठी पुत्रासह काश्मिरास फौज रवाना, बादशहाच्या बंधूचा स्वतःचे कबिले वजिराबाद येथे ठेवण्याबद्दल रणजितसिंग याचेशी जाबसाल, १५ साबान, सु. १२१४/१३ ऑगस्ट १८१३ (१८३३६) ; मिर असदअलीचे नरवर येथे प्रयाण, बादशाहाचे कूच, खंदारच्या फौजेचे बादशहाच्या कुमकेस आगमन, वजिराचे अटकेपार प्रयाण, भोसले याजकडील असदअली व वजीर महंमद यांचा तह, भोपाळ येथील असदअलीचे मोर्चे उठवून बाळाभाऊ याची मोर्चेबंदी, २५ साबान, सु. १२१४/२३ ऑगस्ट १८१३ (१८३३७) ; मोहनसिंग याचा आघाडीस डेरा, ज्याहानाबादकर व ग्वाल्हेरवाल्यांची लढाई, २ रमजान, सु. १२१४/२९ ऑगस्ट १८१३ (१८३३८) ; वकिलाची रणजितसिंग याच्याशी भेट, ज्यानबत्तीस याचे अरुण येथे मोर्चे, २ रमजान, सु. १२१४/२९ ऑगस्ट १८१३ (१८३३९) ; पिसोरच्या शहाचे काबुल येथे गमन, फत्तेखान वजिर याचा काश्मिरहून काबुलास जाण्याचा बेत, रणजितसिंग याचे चिनावद नदीपार प्रयाण, १४ रजब सु. १२१५/३ जुलै १८१४ (१८३४०) ; पेंढाऱ्यांच्या पारिपत्यासंबंधी पारख, मोरो हरि, ज्यानबत्तीस यांचे पेंढाऱ्यांच्या बंदोबस्ताबद्दल खलबत, १ ज. वल, सु. १२१४/२२ एप्रिल १८१४ (१८३४१) ; अरुण पर्वानिमित्य दानधर्म, मोरो हरि व ज्यानबत्तीस याचे खलबत, १२ र. खर, सु. १२१४/४ एप्रिल १८१४ (१८३४२) ; पेंढाऱ्यांचे पारिपत्यास रामदिन कुवर व जिनसी तोफखाना पाठविण्याची होळकर यांना आज्ञा, १ ज. वल, सु. १२१४/२२ एप्रिल १८१४ (१८३४३) ; गोपाळराव रघुनाथ यांचे येथे आत्माराम गुरव याचे कीर्तन, १ ज. वल, सु. १२१४/२२ एप्रिल १८१४ (१८३४४) ; बक्षी यास फौजेतील लोकांचा खर्चासंबंधी तगादा, घाटगे याच्या ऐवजाबद्दल रामराव फाळके, पारख, गोपाळराव, मोरो हरि यांची चर्चा, १४ रजब, सु. १२१५/३ जुलै १८१४ (१८३४५) ; शिलेदारांच्या ऐवजाबद्दल बक्षी यास मोरो हरि याचे आश्वासन, रणजितसिंग याचा दिवाण मोहकमसिंग व पुत्र खडकसिंग यांचेशी शहाकडील वजिराची लढाई व वजिराची माघार, ७ साबान, सु. १२१४/५ ऑगस्ट १८१३ (१८३४६) ; होळकर यांचेकडून होणाऱ्या उपद्रवाच्या बंदोबस्ताबद्दल कोटेवाला वकील व हिरेखान यांची विनंती, महालांतील उपद्रवाबद्दल होळकर यांची तक्रार, ७ साबान, सु. १२१४/५ ऑगस्ट १८१३ (१८३४७) ; नागोजी गुन्ड याचा बऱ्हाणपुर येथील मामलतीबद्दल जाबसाल व मेवात्यांची गुन्डाकडे रोजमुऱ्याची मागणी, गोपाळराव रघुनाथतर्फे रणजितसिंग याजकडे मनुष्य रवाना, अटकसाठी शीख व बादशहाची लढाई, ३० मोहरम, सु. १२१४/२३ जानेवारी १८१४ (१८३४८) ; नुरा कुंजडा व बीडवाल्या फकिराच्या गांवांच्या देवघेवीच्या निवाड्याची आज्ञा, शीखांचा दारूगोळा लाहोर येथून अटकेस रवाना, मोहकमसिंग याचे अटकेपार प्रयाण व शहाच्या मुलुखांत सरहद्दीवर तोफांचा मारा, मुलतानवाल्यांनी स्वतःच्या मुलुखांत नाकेबंदी

दप्तर क्रमांक ३३, पुडके क्रमांक ३—चालू

बातमीपत्रे : चालू—

केल्यामुळे तिकडे फौज रवाना माचेडीवाले यांचेशी मटकनसाहेबातर्फे रेवडीच्या पलटणींचा तह, ३० मोहरम सु. १२१४/२३ जानेवारी १८१४ (१८३४९); त्रिंबकराव दाभाडे याच्या पुत्रप्राप्तीस्तव उत्सव साजरा करण्यासंबंधी चिमणाबाईची कारभाऱ्याशी चर्चा, ४ रमजान/इ. स. १८११–१८ (१८३५०); पुत्राच्या निधनाने हिरेखान जमादार दुःखी, आंगऱ्यांचे बऱ्हाणपुरास आगमन, यशवंतराव शिवाजी याजकडील मेवाडमधील महालांची हिंदुराव घाटगे याजकडे नेमणूक, २६ रजब, सु. १२१४/२५ जुलै १८१३ (१८३५१); मीरखान याचा होळकर याचेकडे जाण्याचा बेत, बापू शिंदे याजकडून जयपूरमधील गांवाची खराबी, मीरखान याजकडील महंमद इसब याचेशी शिंदे याच्या बंदोबस्ताबद्दल जयपूरवाल्यांचा जाबसाल, ३० मोहरम सु. १२१४/२३ जाने. १८१४ (१८३५२); बाळाजी सिद्धेश्वर व खाजगीवाले यांची यशवंतराव दाभाडे यास आणण्यास रवानगी, २२ मोहरम सु. १२१४/१४ जान. १८१४ (१८३५३); बाळोजी कुंजीर याचेशी पेंढाऱ्यांकडे बाजीराव पेशव्याने हुजरे पाठविल्याबद्दल खलबत, श्रीमंतांकडून पेंढाऱ्यांच्या खर्चास बंदोबस्त, ५ सफर सु. १२१४/२७ जाने. १८१४ (१८३५४); दिल्ली व ग्वाल्हेरच्या साहेबाच्या बदलीचा विचार, लढून चिनावलीचा किल्ला सर करण्याचा मोहकमसिंग याचा इरादा, काश्मीरच्या रयतेच्या आबादीबद्दल कमाविसदारास फत्तेखान वजिराची ताकीद, बापूजी शिंदे याच्या बंदोबस्ता-बद्दल जयपूरवाले यांचे मटकन साहेबास पत्र, मीरखान याचे जालिमसिंग यास भेटून होळकरांकडे गमन, ५ सफर सु. १२१४/२७ जाने. १८१४ (१८३५५); पारख याच्या स्त्रीचा मृत्यू, करीमखान व मीरखान यांचे पेंढाऱ्यासह शिकारीस गमन, करीमखान याजकडील लोकांच्या खर्चाची मीरखान याजकडून तरतूद, माचेडीवाल्यांशी इंग्रजांचा तह, १७ सफर सु. १२१४/८ फेब्रु. १८१४ (१८३५६); रामदीन याजकडून मेवाडातील खराब झालेल्या महालांबद्दल ज्यानबक्तीस याची नुकसान भर-पाईच्या ऐवजाची मागणी, नाथद्वार येथे उपद्रव लागू न देण्याबद्दल बापू शिंदे यास पत्र रवाना, २९ र. वल सु. १२१५/११ मार्च १८१५ (१८३५७); मार्तंडराव रामचंद्र यांस उज्यैन येथील दिवाण-गिरी देण्याचा बेत, इस्तरेची साहेब याचा चमेलीचे घाटांत पलटणे ठेवण्याचा बेत, शहा याजकडील वकीलांचे रणजितसिंग यांचेकडे गमन, २९ सफर सु. १२१४/२० फेब्रु. १८१४ (१८३५८); मीर इसबअली याच्या मातुश्रीच्या खर्चाची व्यवस्था, ५ र. खर सु. १२१४/२८ मार्च १८१४ (१८३५९); हजरीचे कामावर धोंडो कोल्हे याची नेमणूक, सेनापतीकडील शागिर्द पेशा लोकांच्या खर्चाची व्यवस्था, २ र. खर/इ. स. १८११–१८ (१८३६०); यशवंत शिवाजी व ज्यानबक्तीस यांची भेट, पेंढाऱ्यांच्या व सुभ्यांच्या बंदोबस्ताबद्दल जाबसाल, रणजितसिंग याच्या वकिलाशी जर्नेल याची भेट, ११ सवाल/इ. स. १८११–१८ (१८३६१).

पुडके क्रमांक ४

का. सं. १८५ (१८३६२–१८५४६), सु. स. ११६०–१२१९, इ. स. १७५९–१८१९.

पत्रे :

गोविंदराव कृष्ण महेदळे—बापू*, आप्पासाहेब*: जलचर लोकांच्या गलबतांचे बाणकोट येथे आगमन झाल्याचे पार मुक्कामी वर्तमान (१८५४२).

तिमाजी शिंदे—बाबासाहेब* : गायकवाडाच्या पालमपूरवर सखाराम याची नेमणूक, गंगाधर शास्त्री यांजकडे इंग्रज फिरंगी याजकडील वकीली, गंगाधर शास्त्र्यांना फत्तेसिंग गायकवाड याची दिवाणगिरी, १७ मोहरम सु. १२१४/१० जाने. १८१४ (१८४९६); विठ्ठलराव बाबाजी याजकडे सरकारची दिवाणगिरी, गंगाधर शास्त्रीकडे फिरंग्याकडील कारभार असल्याने गायकवाड मंडळींना काळजी, पुण्याचे सरकारी बंदोबस्तासाठीं शास्त्री यांचे पुणे येथे गमन, २५ साबान श्रावण/इ. स. १८१२–१४ (१८४९७).

दौलतराव शिंदे—बाळाजी लक्ष्मण : निंबाजी भास्कर यांची वतनवृत्ती परत करण्याबाबत, १७ रजब, सु. १२१३/२७ जुलै १८१२ (१८३९०).

---

* मूळ नावांची निश्चिती नाही.

दप्तर क्रमांक ३ ई, पुडके क्रमांक ४—चालू

पत्रे : चालू—

धोंडो पद्‌माजी—रावसाहेब* : कुशलार्थ पत्र पाठविण्याची विनंती, ४ जिल्हेज (१८४६१).

बाजीराव रघुनाथ—त्रिंबकजी डेंगळे : मुलीचे लग्नप्रसंगी वरपक्षाकडून हुंडा घेऊ नये म्हणून ब्राम्हण मंडळींना ताकीद करण्याविषयी, सु. १२१२/इ. स. १८११-१२ (१८४५१).

बाजी शंकर—पंतप्रधान* : कल्याणकर भोई याजबरोबर आंबे रवाना, २९ जिलकाद (१८४५६).

राजाराम खंडेराव—नाना फडणीस : फौजेसह तापी तीरास गेल्याचे समजल्यावरुन श्रीमंतांच्या मुक्कामाची विचारणा, १४ जिल्हेज, सु. ११७६/५ फेब्रु. १७७६ (१८४६०).

शामराव जगजीवन—पंतप्रधान* : चिमण जोशी यास नजरकैद (१८४५९).

हैबतराव जाधव—पंतप्रधान (बाळाजी बाजीराव) : आज्ञेनुसार खंडेराव जाधव याच्याशी भांडण न करता उभयतां हुजूर आगमन, १० मोहरम, सु. ११६०/३ सप्टे. १७५९ (१८४५७).

बातमीपत्रे :—(दौलतराव शिंदेकडील).

(फक्त प्रेषकांचा नामोल्लेख असलेली)

कृष्णाजी गायकवाड—(—) : दौलतराव शिंदे यांचे गोपाळराव रघुनाथ यांचेशी खलबत, महादजीबाबा यांचे श्राद्ध, २९ सफर सु. १२१४/२० फेब्रु. १८१४ (१८३६२); दौलतराव शिंदे यांची मानकऱ्यांशी बोलणी, ब्राम्हणांस दिलेल्या दक्षिणेचा तपशील, चाकरांना सनगे दान, ३ ज. खर/इ. स. १८११–१५ (१८३६३); सावकाराकडे चाकरीस असलेल्या मुसलमानांकडून सावकाराच्या मुलाचा खून, बायजाबाई व साळुबाई यांची भेट, रामचंद्र भास्कर, माधवराव गुरुजी यांची दौलतराव शिंदे यांच्याशी भेट, दौलतराव कदम यांचे पित्यास देवाज्ञा, ३ र. खर/इ. स. १८११–१५ (१८३६४); दौलतराव शिंदे, बाबाजी पाटणकर व मोरो हरि यांच्या भेटी व रामचंद्र भास्कर याच्याशी खलबत, वजीर महंमदखाँ भोपाळवाला यांस होळकर, शिंदे यांच्याकडून होणाऱ्या उपद्रवाचा बंदोबस्त, रामदीन याजकडून होणाऱ्या उपद्रवाच्या बंदोबस्ताची विनंती, २० जिल्हेज/इ. स. १८११–१५ (१८३६५); बाळाबाई देशमुख यांच्या प्रकृतिचे स्वास्थ्य चौकशीसाठी दौलतराव शिंदे यांचे गमन, बाळाजी सखदेव यांचे महायात्रेहून आगमन, त्रिंबकराव दाभाडे यांजकडील उंटाचा उपद्रव, गोपाळराव रघुनाथ आजारी, ४ र. खर/इ. स. १८११–१५ (१८३६६); कुस्ती खेळण्याचा कार्यक्रम, गोपाळराव रघुनाथ वगैरे लोकांना दौलतराव शिंदे याजकडून भेटीचे आमंत्रण, १४ र. वल सु. १२१४/७ मार्च १८१४ (१८३६७); आप्पा चिटणीस व दौलतराव शिंदे यांची चर्चा व गोकुळ पारख, मणीराम शेट यांचेबरोबर खलबत, जयपूरवाल्यांना उपद्रव न देण्याबद्दल बापू शिंदे यास ताकीद, ५ र. वल, सु. १२१४/२६ फेब्रु. १८१४ (१८३६८); यशवंतराव दाभाडे यांचे शिकारीस गमन, ३ र. खर/इ. स. १८११–१५ (१८३६९); दौलतराव शिंदे यांची कारभारी, मानकरी, वकील वगैरे लोकांशी भेट, कर्णेल ज्यानबत्तीस यांस वस्त्रे देऊन सत्कार, ५ र. वल, सु. १२१४/२६ फेब्रु. १८१४ (१८३७०); गंगाजळ व गंगा प्रसादाची वस्त्रे मंडळींना दिल्याबद्दल, बापूजीराव शिंदे यांच्या कहीचे सुभेदारांस सांगोनेरवाले यांनी मारुन टाकल्याबद्दल, इंदूरच्या रोखे होळकरांच्या फौजेचे कूच, १ ज. वल सु. १२१४/२२ एप्रिल १८१४ (१८३७१); चिमणाबाईच्या डोहाळजेवणास हजर राहण्याची दौलतराव शिंदे यांना विनंती, आबाजी घाटगे, जगदेवराव निंबाळकर वगैरे लोकांशी भेट, चिमणाबाईस दागिन्यांचा आहेर, १४ रजब सु. १२१४/३ जुलै १८१३ (१८३७२); दौलतराव शिंदे, मल्हारजी भिकाजी व मुकुंदराव खासगीवाले यांची भेट, आग्र्याहून कलावंतिणींच्या ताफ्यांचे आगमन व नाचाचा कार्यक्रम, २८ र. वल, सु. १२१४/२१ मार्च १८१४ (१८३७३); गोपाळराव रघुनाथ याजकडून हिशेब तपासणी, रखमाबाई व बायजाबाई यांचे कोटेश्वराचे दर्शनासाठी गमन, दौलतराव शिंदे याच्या शिकारीचे वर्णन, १७ र. वल सु. १२१४/१० मार्च १८१४ (१८३७४); आनंदराव जाधव व माधवराव तोफखाने यांची दौलतराव शिंदे यांचेशी भेट, ६ साबान, सु. १२१५/२४ जुलै १८१४ (१८३७६); पेंढारी लोकांचा माळवे प्रांती दंगा, ५ र. खर, सु. १२१४/२८ मार्च १८१४ (१८३७७); बाळाबाईच्या भेटीसाठी त्रिंबकराव दाभाडे यांचे गमन, जयपूरच्या पलटणींकडून जयपूरमध्ये लूटालूट, १२ र. खर, सु. १२१४/४ एप्रिल १८१४ (१८३७८); दौलतराव दाभाडे यांचेशी मुलाखत, रंगपंचमीच्या उत्सवास निमंत्रण

---

* मूळ नावांची निश्चिती नाही.

पत्रे : चालू—

बाळाजी यशवंत यांचे ग्वाल्हेर येथे गमन, नागपुरकरांकडून घोडीची मागणी, ७ र. खर, सु. १२१४/ ३० मार्च १८१४ (१८३७९) ; ग्वाल्हेर येथील मठातील बैराग्यांस नेमणूक, रखमाबाई व बायजाबाई यांचे मठास गमन, १७ र. वल, सु. १२१४/१० मार्च १८१४ (१८३८०) ; यशवंतराव व त्रिबकराव दाभाडे यांचे बागेत गमन, हत्तीच्या झुंजीचे वर्णन, ६ साबान /इ. स. १८१२–१५ (१८३८१) ; दौलतराव शिंदे यांनी केलेल्या हरणाच्या शिकारीचे वर्णन, १ मोहरम/इ. स. १८१२–१५ (१८३८२) ; रखमाबाइचे प्रकृतीस अस्वास्थ्य, शिखांच्या कैदेत असलेल्या सुज्यानमुलुक बादशहा याच्या बायकोचे पलायन, दौलतराव शिंदे व बाळोजी कुंजीर यांची भेट, ५ मोहरम इ. स. १८१४–१५ (१८३८३) ; दौलतराव शिंदे याजकडून घोडीची निवड, मांडव तयार/ करण्यास लाकूड रवाना, रखमाबाई, चिमणाबाई व बाळाबाई यांचा कलावंतिणीचे नाचकाम पाहाण्याचा कार्यक्रम, २५ र. वल/इ. स. १८१४–१५ (१८३८४) ; संभाजी आंग्रे याजकडून होणाऱ्या उपद्रवाचा बंदोबस्त करण्याबद्दल जमीनदारांची विनंती, दौलतराव याजकडून ब्राह्मणांना दानधर्म, २९ र. वल, सु. १२१५/११ मार्च १८१५ (१८३८५) ; दौलतराव यांची चिमणाजी देशमुखाशी अर्थव्यवस्थेविषयी व नरवरचे किल्याच्या बंदोबस्ताबद्दल चर्चा, २८ सवाल, सु. १२१४/ २४ ऑक्टो. १८१३ (१८३८६) ; दौलतराव व जयसिंग हुजऱ्यांची भेट, त्रिबकराव दाभाडे यांचे शिकारीस गमन, चिटणीस याजकडे लग्नाचे खलबत, २३ र. वल/इ. स. १८११–१५ (१८३८७) ; घोड्यांचा बंदोबस्त करण्याची विनंती, सखाराम लक्ष्मण यांचा विवाह समारंभ, २० र. वल, सु. १२१५/२ मार्च १८१५ (१८३८८) ; अनेक लोकांकडून दौलतराव शिंदे यांना आलेल्या नजराण्याचा तपशील, कलावंतिणीच्या नाचाचा कार्यक्रम, २३ सफर, सु. १२१४/१४ फेब्रु. १८१४ (१८३८९) ; शहाकडील वकिलाचे आटक उतरुन शिखाकडे आगमन होण्यापूर्वी शहाकडील तीन किल्ले खाली केल्याचे वर्तमान, मोहकमसिंग दिवाण बोलणी करण्यास रवाना, कलकत्त्यास नवीन नेमणूक झालेल्या गव्हर्नर जनरल यांस मटकन साहेबाकडून नजराणा, १७ सफर, सु. १२१४/८ फेब्रु. १८१४ (१८३९१) ; यमुनाबाईच्या नांवे दानधर्म, मेवाडांत मणासा गावास यशवंतराव शिवाजी यांचा व आमझऱ्यास जगन्नाथ राम यांचा उपद्रव, दिल्लीतील रणजितसिंग शीख याच्या वकिलास कचेरीस येण्याची बंदी, ३ सफर, सु. १२१४/२५ जाने. १८१४ (१८३९२) ; आप्पा चिटणीस व जगदेवराव निंबाळकर यांच्याशी दौलतराव यांचे खलबत, आग्र्याची पलटण फत्तेपुरास गेल्याचे वर्तमान, माळव्यात पेंढाऱ्यांचा उपद्रव, १८ जिल्काद सु. १२१४/१२ नोव्हे. १८१३ (१८३९३) ; तोफखाना पलटण व पागेकडील लोकांच्या खर्चाविषयी, सुज्यानअली बादशहाचे लाहोरास आगमन व त्यास अटकेचा किल्ला नजर, रणजितसिंग यास नजराणा, महंमदशहा याच्या वजिराच्या फौजेचे वर्तमान, १२ रजब, सु. १२१४/११ जुलै १८१३ (१८३९४) ; मोरो हरि व मल्हार बक्षी यांस लोकांच्या खर्चाबद्दल विचारणा, दानसिंग याच्या पलटणांकडून टोक महालाची खराबी, पीरखान याचा मृत्यू, १२ रजब, सु. १२१४/११ जुलै १८१३ (१८३९५) ; त्रिबकराव दाभाडे यांचे घरी ब्राह्मण संतर्पण, ऐवजाबाबत बक्षी यास ताकीद करण्याची पाटणकर याची विनंती, शाहाने शिखाकडील नेलेली कही परत आणली त्यासंबंधीचे वर्तमान, ८ रजब, सु. १२१४/७ जुलै १८१३ (१८३९६) ; नारो नरसी याजकडील हिशेब व मल्हार चिमाजीकडील लोकांच्या खर्चासंबंधी चर्चा, अजमीरच्या पीरजाद्यास वस्त्रे, कर्नल ज्यानबत्तीसशी खलबत, भोपाळ व पेंढारी यांच्या बंदोबस्तासाठी शामराव फाळके व कर्नल ज्यानबत्तीस यांना माळव्यांत पाठविण्याचा बेत, शिखांशी लढण्यासाठीं शाहास मुलतानवाल्याकडून पैशाची तरतूद व शिखांशी न लढण्याचा बादशहा याचा मनोदय, २३ सफर/इ. स. १८१२–१८१५ (१८३९७) ; रात्री वाड्यांत राहिल्याबद्दल बक्षी यास ताकीद, बाबाजी पाटणकर यांचे पैशासाठी धरणे, आप्पा चिटणीस यास बायजाबाई दाभाडे हिजकडून बहुमानाची वस्त्रे, अजमीरच्या मामलतीविषयी बाळोजी इंगळे याचे पत्र, १२ रजब, सु. १२१४/११ जुलै १८१३ (१८३९८) ; बक्षी यास खर्चास ऐवज देण्याबद्दल, दाभाडे यांच्या बागेत वट सावित्रीचा समारंभ, ५ रजब सु. १२१४/४ जुलै १८१३ (१८३९९) ; खाजगीवाले यांजवळ जवाहिरखान्याची चौकशी, बाबाजी व द्वारकोजी पाटणकर यांस घरखर्चास दिलेल्या गावासंबंधी, ५ रजब, सु. १२१४/४ जुलै १८१३ (१८४००) ; तोफखान्याच्या व्यवस्थेबाबत माधवराव तोफखानेवाले यांस आज्ञा, त्रिबकजी डेंगळे यांच्या रेवातिरीच्या स्वारीचे वर्तमान ५ रजब, सु. १२१४/४ जुलै १८१३ (१८४०१) ; दत्ताजी शिंद्याचे श्राद्ध, रामचंद्र कृष्ण भुसकुटे व बाबुराव आंग्रे यांच्या मृत्यूचे वर्तमान, १६ सवाल, सु. १२१४/१२ ऑक्टो. १८१३ (१८४०२) ;

पत्रे : चालू--

चोर गिराशांना पकडण्यास शिंद्याकडील लोक रवाना, २५ जिल/इ. स. १८१२–१५ (१८४०३); कायमखान पठाण व मुलतानवाला यास मोहरा वगैरे भेट, गोरख्यांनी महाल घेउन पुढे चाल केल्याचे वर्तमान, रांगड्यांच्या दंग्याबद्दल रामराव फाळके याची विनंती, अंबाजी घाटगे याचा होळकरांच्या मुलुखांत दंगा, १९ साबान, सु. १२१४/१७ ऑगस्ट १८१३ (१८४०४); मल्हारराव याच्या ऐवजाबद्दल, जगन्नाथराम यांच्या फौजेचे पारिपत्य, कर्णेल ज्यानबत्तीस याने घेतलेला शितू पेंढाऱ्यांचा महाल, माचलपूरच्या जमिनदारांस दुंदेखान याजकडून उपद्रव, १० रमजान सु. १२१४/६ सप्टे. १८१३ (१८४०५); आमावास्या पर्वानिमित्त अश्वथ पूजा, खर्चाकरिता मिरखानाकडे पठाणांचा दंगा, रणजितसिंग शीख याजकडे गेलेल्या कारकुनांस व अलिज्याबहाद्दर यांना वस्त्रे रवाना, २० र. खर सु. १२१४/१२ एप्रिल १८१४ (१८४०६); महालांचे व कारखान्यांचे हिशेबासंबंधी नागोजी गुंडाशी चर्चा, महंमद बादशहाचे जवाहिर लुटण्याविषयी खडकसिंग याचे रणजितसिंग यांस पत्र, भीमथंडा किल्यावर गोरख्याकडील फौजेचे आक्रमण झाल्यामुळे मोहरसिंग याचे पलायन, मोहरसिंग यास सामील होऊन गोरख्याचे पारिपत्य करण्याविषयी राणीचे रणजितसिंग यास पत्र, १८ साबान, सु. १२१४/१६ ऑगस्ट १८१३ (१८४०७); फिरंग्यांच्या पलटणांचा कोचेकडे छावणी करण्याचा विचार, गुजाराचे गांवांवर पलटणे रवाना, बाबा पाटणकर व माहूरकर यांचे बक्षींकडे ऐवजाकरिता धरणे, मुलतानचा मुलुख घेण्याविषई शाहाचे रणजितसिंग यास पत्र, २ रमजान, सु. १२१४/२९ ऑगस्ट १८१३ (१८४१९); दौलतराव शिंद्याचे गोपाळराव रघुनाथ यांचेशी खलबत, मानकऱ्यांस दसऱ्यास ऐवज देण्याबाबत, हवनाचा समारंभ, शमीपूजन, २८ सवाल, सु. १२१४/२४ ऑक्टो. १८१३ (१८४२०); गिराशांचे पारिपत्य, मणिराम याजकडून जादा वसुली, हिरातसिंग जमातदाराकडील सारवानांना मारण्याचा प्रयत्न, रायगडच्या गढीवर मीरखान याचा हल्ला, २० ज. खर, सु. १२१४/२० जून १८१३ (१८४२१); त्रिंबकराव व यशवंतराव दाभाडे यांस दिलेला ऐवज, मानकरी वगैरे यांजकडून नजराणा, मिर्जाचा मृत्यू, हिंदुराव घाटगे यास दसऱ्याची वस्त्रे, सिरपेच वगैरे बहुमान, २८ सवाल, सु. १२१४/२४ ऑक्टो. १८१३ (१८४२२); देशी जाण्यासाठीं संभाजी आंग्रे याची विनंती, यशवंतराव व त्रिंबकराव दाभाडे यांस दसऱ्याची वस्त्रे, मोरो हरीने आंग्रे यांजकडे जाऊन केलेली हिशेब तपासणी, २८ सवाल, सु. १२१४/२४ऑक्टो. १८१३ (१८४२३); फौजेच्या खर्चासंबंधी, जेकमसाहेबाच्या मुलाचा मृत्यू, यशवंतराव दाभाडे याची शिवराव हरीजवळ कर्जाची मागणी, अलिज्याबहाद्दर व कुंजीर यांचे सरंजामी महालाबाबत बोलणे, ५ सवाल, सु. १२१४/१ ऑक्टो. १८१३ (१८४२४); देवराव निंबाळकर याच्याशी ऐवजाबद्दल खलबत, बीडवाले व चपराशी यांच्यातील तंटा, सेनापती व बाळाजी सिद्धेश्वर यांच्या खर्चाचा बंदोबस्त, ५ सवाल, सु. १२१४/१ ऑक्टो. १८१३ (१८४२५); पिछोऱ्याचा मोर्चा, रामराव फाळके याजकडील बातमी, मानकरी यांचेशी खर्चासंबंधी चर्चा, १६ सवाल, सु. १२१४/१२ ऑक्टो. १८१३ (१८४२६); शिलेदारांचा खर्च, कृष्णगडवाल्यांशी व जयपूरवाल्यांशी मीरखान पठाण याची लढाई, मीरखान यास पुत्र झाल्याचे वर्तमान, ९ सवाल, सु. १२१४/५ ऑक्टो. १८१३ (१८४२७); रामराव फाळके, माधवराव तोफखानें यांचा फौजेसह पिछोरे येथे जाण्याचा विचार, उरुसाच्या भोजनाबाबत, ९ सवाल, सु. १२१४/५ ऑक्टो. १८१३ (१८४२८); त्रिंबकराव दाभाडे यांच्या ऐवजासंबंधी, पुण्याची डाक व कचेरीचे कामकाज, ९ सवाल, सु. १२१४/५ ऑक्टो. १८१३ (१८४२९); आनंदराव शिंदे यांचे श्राद्ध, कर्णेल ज्यानबत्तीस यांचे अरुण येथे ठाणे, पिसोरवाल्याकडून रामराव फाळके व माधवराव तोफखाने यांचा पराभव, अमरसराकडील वर्तमान, शितू पेंढाऱ्यांच्या महालासंबंधी, १६ सवाल, सु. १२१४/१२ ऑक्टो. १८१३ (१८४३०-१८४३१); ज्वालामुखी देवाचे दर्शनास रणजितसिंगाचे गमन, बाळोजी कुंजीर यांचेशी खलबत, ९ जिलकाद, सु. १२१४/३ नोव्हे. १८१३ (१८४३२); त्रिंबकराव दाभाडे यांच्या सरंजामाचा बंदोबस्त, गोकुळ पारख याची रामचंद्र भास्कर यास सरकारी काम करण्याबाबत विचारणा, ९ जिलकाद, सु. १२१४/३ नोव्हें. १८१३ (१८४३३); गोटाच्या जागेचा मुहूर्त, कबुतरखान्याच्या जागेची इंग्रजांकडून मागणी, प्रतिनिधींची कैदेतून सुटका करण्याचा विचार, बापू मैराळ यांजकडे पैशाची मागणी, आप्पासाहेबांच्या खर्चाविषयी, २५ जिल./इ. स. १८११–१५ (१८४३४); अंबाजी घाटगे यांच्याविषयी गोकुळ पारख याच्याशी खलबत, आबाजी खंडेराव याने मुलुखात दंगा करू नये म्हणून ताकीद, २९ ज. खर/इ. स. १८११–१५ (१८४३५); बापूराव शिंदे याने जयपूरचा मुलुख लुटल्याचे वर्तमान, २ सफर, सु. १२१४/२४ जाने. १८१४ (१८४३६); शिलेदार यास खर्चास

पत्रे : चालू—

देण्याचे आश्वासन, जागा व गढी पिछोरीवाले यांच्या स्वाधीन, भरतपूरवाले रावराजे यांजकडील दिल्लीतील वकीलांना इंग्रजांकडून दरबारांत येण्याची मनाई, २ जिल्हेज, सु. १२१४/२६ नोव्हे. १८१३ (१८४३७) ; हजीरनीस यास लग्नासाठीं ऐवज देणगी, इस्तरेची साहेबाकडून ऐवज जमा, रणजितसिंग शीखाकडे गुलाम हुशन वकीलाचे आगमन, ३ सफर, सु. १२१४/२५ जाने. १८१४ (१८४३८) ; बाळाराम शेटच्या आईचा मृत्यू, त्याजकडे दुखवटयाची वस्त्रे रवाना, १७ सफर, सु. १२१४/८ फेब्रु. १८१४ (१८४३९) ; नागोजी गंड याजकडे बऱ्हाणपूरची मामलत, फकीराकडील ऐवजाबाबत नुरा कुंजडा यास विचारणा, घोडयांच्या हजेरीत लबाडी केल्यावरुन काशीराव खंडागले याची लष्करांतून हकालपट्टी, ४ सफर सु. १२१४/२६ जाने. १८१४ (१८४४०) ; दौलतराव शिंदे व बाळाराम शेट यांचे खलबत, नाना शिंदे व दौलतराव शिंदे यांचे बक्षीसह आगमन, बाळाबाई शितोळे हिचे घरी तुळशीचे लग्न, ३ र. खर सु. १२१५/१५ मार्च १८१५ (१८४४१) ; राघोगडास लढाई होण्याचा संभव, हिंमत बहादूर फकीरजी गाढवे वगैरेचे आगमन, हिंदुराव व आप्पा चिटणीस यांचेशी चर्चा, मोहनसिंग याची भेट, दक्षिणेत जात असलेल्या कफिलाच्या सुरक्षिततेसाठीं कोटेवाले येथे पत्र, ६ रमजान, सु. १२१७/१ ऑगस्ट १८१६ (१८४४२) ; हिंदुराव घाटगे यांस सरंजाम, रणजितसिंग शीख याचे काश्मीरमध्ये गमन, काश्मीरवाला फौजेसह बाहेर निघाल्याचे वर्तमान, उष्णतेमुळे लोकांचे मृत्यू, २ साबान, सु. १२१५/ २० जुलै १८१४ (१८४४४) ; नव्या वाडयाच्या मुहुर्ताबद्दल ब्राह्मणांस दानधर्म, अंबाजी घाटगे याच्या खर्चाचा बंदोबस्त, कर्णेल ज्यानबत्तीस याचा बहादूरगडास मुक्काम व शाहाडोरा येथे पलटणींची रवानगी, भूपाळवाला व कर्णेल यांचा मुलुख देण्याबाबतच्या करारासंबंधी, यशवंतराव शिवाजी याचा सुज्यालपुर येथे व रामदीन याचा पंच-महालांत दंगा, २ साबान, सु. १२१५/२० जुलै १८१४ (१८४४७) ; सावंतवाडी येथे बाबाजी पाटणकर व आप्पा चिटणीस यांची चाकरीसाठीं रवानगी, बाळाबाई यांचेकडे चिमणाबाई हिच्या डोहाळे जेवणाचा समारंभ, १४ रजब, सु. १२१५/३ जुलै १८१४ (१८४४८) ; दौलतराव शिंदे याजकडून ग्रहाची पूजा, गोकूळ पारखतर्फे त्रिंबकराव दाभाडे यांना खर्चास ऐवज, रामचंद्र भास्कर याजकडील जप्तीत असलेल्या टोक महालाची मोकळीक, १० रमजान, सु. १२१४/६ सप्टे. १८१३ (१८४५३) ; इंग्रजांचे चेनापटणकर यांचेशी खलबत, इंग्रजांचे चिंचवड येथून पुण्यानजिक आगमन, रास्त, पटवर्धन, गोखले वगैरेच्या फौजांस खडकीस जाण्याची ताकीद, वैजनाथ भट याचा कोकणात दंगा, शिंदे, होळकर यांचा संघर्ष व होळकर यांचे पारिपत्य करण्याबद्दल मोगलांचा संकेत, खंडेराव रास्ते व सदाशिव माणकेश्वर यांचा राजकारणांत प्रामुख्याने भाग, नोव्हे. १८१७ (१८५३४).

गोविंदराव कृष्ण मेहेंदळे—(—) : सौ. बाईसाहेबांचे पोलादपूर, पाचवड येथून रायगड येथे आगमन, कार्तिक शु. ७/इ. स. १८१३-१४ (१८५४०) ; कार्तिक शु. ९/इ. स. १८१३-१४ (१८५४१) ; बाईसाहेबांनी घेतलेले महाबळेश्वराचे दर्शन, इंग्रजलोक महाड येथे आल्याची वार्ता, कार्तिक शु. ६/इ. स. १८१३-१४ (१८५४३) ; बाईसाहेबांनी रायगड येथे श्री सिरकाबाई हिचे केलेले दर्शन, बाणकोट येथे शांतता, कार्तिक शु. ९/इ. स. १८१३-१४ (१८५४४) ; अमृतराव ठाकूर यांचेबरोबर स्वारांची पुण्यास रवानगी, मोरोपंत लेले व दादा ढमढेरे यांचे पथकाशिवाय गमन, इ. स. १८१३-१४ (१८५४५) ; बाईसाहेबांचें पार यथ आगमन, कार्तिक शु. ४/इ. स. १८१३-१४ (१८५४६).

जगन्नाथ चितामण—(—) : कर्नल क्लोजकडे गायकवाड याजकडून मिठाईची पाठवणी, हरेश्वर सावकाराची भेट, नवलखान व डॉक्टर यांची भेट व क्लोज याची घोडयांवरील रपेट, २८ सवाल (१८४५४).

तिमाजी शिंदे—(—) : गंगाधर शास्त्री यांचे कामकाजासाठीं पुण्यास आगमन, हुकुमानुसार वर्तन करण्याची फिरंग्यांची तयारी, १७ मोरहम पौष/इ. स. १८१२-१८१३ (१८४९४).

त्रिंबक बच्याजी—(—) : शिंदे यांजकडील इंग्रजांची शाम पामरकडे येऊन बातचीत, फकरुद्दीन हुसेनखान याजकडे हिंमतखान, बोहरी व बापू बिडकर वगैरेंचे आगमन, २५ सफर, सु. १२००/२९ जुलै १७९९ (१८५३९).

निंबाजी हरि—(—) : गोपाळराव व भास्करराव यांचेशी सखाराम घाटगे याचे खलबत, कृष्णराव चिटणीस यास वस्त्रे देण्याबाबत, ४ सवाल/इ. स. १८११-१८१४ (१८४९१) ; दौलतराव शिंदे व यादवराव भास्कर यांचे खलबत व यादवरावांचे पुणे येथे गमन, घाटगे यांचे मुलीस आणण्यासाठीं यशवंतराव

पत्रे : चालू—

पाटणकरांचे गमन, २९ ज. वल/इ. स. १८११–१८१४ (१८४९२) ; मामा आंग्रे यांची मानजी आंग्रे याजवर चढाई, मामा आंग्रे यास परत फिरण्याची आज्ञा व दोघेही परत फिरल्याचे वर्तमान, ८ सवाल/इ. स. १८११–१८१४ (१८४९८).

परशुराम अनंत सावरकर—(—): नंदराम याचे आगमन, ग्रांटसाहेबास पलटणाची सलामी, पोटसाहेबांचे लग्न (१८५३२).

पांडुरंग लक्ष्मण—(—): आभेपुरीच्या बोलीच्या सुटकेसाठीं ऐवजाची मागणी, भाऊ जोगळेकर याचा ऐवज देण्याबद्दल महादाजी त्रिंबक यास तगादा, भिकंभट गोरे यास धर्मादाय नेमणूक, पांडवगडच्या राघोजीराव हवालदार याचा तनखा, पाचवड येथील न्यायाधिशाकडील जमिनीचा वसूल, ५ र. वल, सु. १२१७/२३ जाने. १८१७ (१८४६६–१८४६९) ; निंबच्या पाटीलाच्या प्रकरणांत कुडाळ घेण्याची सूचना, हरि रामचंद्र साबणे यांच्या घरावरील दरवडेचाचा लागलेला पत्ता, भाऊ-पणाच्या खटल्यामुळे राजाज्ञाचे गांव अमानत, एकसर व भोगाव भक्तवाडी येथील वसुली, मिरजेहून पुण्यास जाणाऱ्या कासारांना कोरेगांव व वाघोली या जकात नाक्यावर अडथळा, १३ र. वल, सु. १२१७/३१ जाने. १८१७ (१८४७०–१८४७५).

बाळाजी खंडेराव—(—): दाजीबा घाटगे याचेशी भेट, श्रीमंतांच्या भेटीस मामा आंग्रे याचे आगमन, बाळोजी कुंजीर याचे आगमन (१८५३८).

बाळाजी व्यंकटेश—(—): करंजे येथील बहिरवाचे देवळांत बाबा फडणिस याजकडून कोंडून ठेवलेल्या लोकांच्या हालाचा बंदोबस्त, १५ रमजान (१८५३१).

बाळोजी सावंत—(—): रामचंद्र वाघ, नारो सखाराम, नरसिंगराव बल्लाळ यांचेसह मुधोजी भोसले याचे नागपूर येथे यशवंतराव मोहिते यांजेकडे मेजवानीसाठीं आगमन, मेजवानीसाठी आलेल्या फिरंग्यांना पोशाख व सिरपेच, १७ रजब, सु. १२१७/३ जून १८१७ (१८४६५).

महादजी चिंतामण—(—): गोकुळदास याच्या गुमास्त्याचे कर्नेल याचेशी बोलणे झाल्यावर बडेखान याजकडे आगमन, १८ र. वल (१८५३५).

राघो खंडेराव—(—): खडकीचे पलटणांत तोफा वाजवून छेडा उभा केल्याचे वर्तमान, १८ रजब/इ. स. १८१७-१८१८ (१८४५५).

रामचंद्र विश्वनाथ—(—): मोरोबादादा यांचे श्री. त्रिंबकेश्वरास सांबाचे दर्शनास गमन (१८५३६) ; श्री. त्रिंबकेश्वराची पूजा, देवास वस्त्रे, ३ सवाल (१८५३७).

लाडोजी वरपे—(—): नरसिंगराव बल्लाळ याच्या मुलीचे लग्नासाठीं व यशवंतराव रामचंद्र यांचे लग्नासाठीं मुधोजी भोसले व इतर मुत्सदी मंडळींची उपस्थिती, फकीरजी गाढवे याचे जाहागिरीची जप्ती, हैद्राबाद येथून आलेल्या पठाणांस फिरंग्यांच्या सल्यानुसार चाकरीस मनाई, ८ साबान, सु. १२१८/२४ जून १८१७ (१८४६४).

विठ्ठल बल्लाळ—(—): दौलतराव शिंदे यांची घोंडीबा व कृष्णोबा चिटणीस वगैरे लोकांबरोबर भेट, व घोड्या-वरुन सफर, ९ मोहरम/इ. स. १८११–१८१५ (१८३७५) ; दौलतराव शिंदे यांच्या खासे महा-लांत ग्रहाच्या होमाची पूजा, बोथाटचा खेळावयास गमन, ७ र. वल, सु. १२००/१० ऑगस्ट १७९९ (१८४१०) ; मोरो हरि याजकडे नेवासे परगण्याच्या सोडचिठ्ठीची मागणी, घाटगे यांच्या कारभारातील खंडू याचे घरावर चौकी, ४ सफर/इ. स. १७९९–१८११ (१८४११) ; बाबुराव आंग्रे, देवजी गवळी, भाऊ फडणीस इत्यादी मंडळी दरबारी हजर, जासुदांस छपरे देण्याची विनंती, १७ र. वल, सु. १२००/२० ऑगस्ट १७९९ (१८४१२) ; घोंडीबा, यादवराव व बाळोजी शेट, राघोजी जामदार यांचे आरसे महालांत खलबत, पागाची रवानगी, जासुदांच्या खर्चाबद्दल विनंती ६ सफर, सु. १२००/१० जुलै १७९९ (१८४१३–१८४१५) ; पुण्याहून आलेल्या वाघाची पाहाणी, २९ सफर, सु. १२००/२ ऑगस्ट १७९९ (१८४१६) ; बापू चिटणीस यांचेसह दौलतराव शिंदे यांचे शिकारीहून आगमन, २१ सफर, सु. १२००/२५ जुलै १७९९ (१८४१७) ; कारभारी घोंडीबा कृष्णाबा, यादवराव भास्कर, बाळाजी शेटे इत्यादि मंडळींची दरबारात उपस्थिती, गोपाळराव चिटणीस याजकडून ऐवजाची मागणी, २५ मोहरम/इ. स. १७९९–१८१२ (१८४१८) ; १० मोहरम/इ. स. १७९९–१८१२ (१८५०९).

पत्रे : चालू—

हरी बल्लाळ—(—) : फकीरजी फडतरे याच्या पागेस चंदी व लागवडीची बेगमी, लोकांच्या नालबंदीचा ऐवज देण्याविषयी, २३ रजब (१८४६३).

(फक्त प्रापकांचा नामोल्लेख असलेलीं)

(—)—राघोपंत गोखले, आबांच्या सांगण्यावरुन दप्तरच्या कागदपत्रांची पहाणी (१८४५८).

(प्रेषक वा प्रापकांचा नामोल्लेख नसलेलीं)

ज्यानबत्तीस, यशवंतरावभाऊ व रामदीन यांच्या मुक्कामाविषयी, २८ जिल्हेज/इ. स. १८११–१८१५ (१८४०८) ; दौलतराव शिंदे यांचे धोंडीबा पागनीस यांचे घरी गमन व बाळोबा पागनीस याचे आबा चिटणीस याजकडे आगमन, ७ रमजान/इ. स. १८१२–१५ (१८४०९) ; माधवराव जिनसीवाले यांनी जेकम साहेब याच्या पलटणांत ठेवलेल्या तोफखान्याच्या बंदोबस्ताविषयी स्वार एकत्र करण्याबद्दल बक्षीयास आज्ञा, ९ साबान, सु. १२१७/५ जुलै १८१६ (१८४४३) ; सेखोजी आंग्रे याचे बारईस गमन, जेकमसाहेबाच्या विनंतीनुसार पलटणे रवाना करण्याची आज्ञा, ९ साबान, सु. १२१७/५ जुलै १८१६ (१८४४५) ; स्वारांची चौकशी, गोकुलपारख याचेशी शिलेदार मंडळींच्या खर्चाविषई खलबत, मेहरवानसिंग व गंगासिंग यांच्या कंपन्या जिनसी तोफांच्या तैनातीस रवाना, जगदेवराव निंबाळकर व आबाजी घाटगे यांचेशी बातचीत, १० साबान, सु. १२१७/६ जुलै १८१६ (१८४४६) ; राघो गडकरी यांचा बुलेखा पापुखा आगरवाले याजकडून पराभव व हिरापूर येथील मोर्चे कायम, ४ रमजान, सु. १२१७/३० जुलै १८१६ (१८४४९) ; बाळाजी नाईक भिडे यांजकडे वरातीचा भरणा, ५ सवाल, मार्गशिर्ष (१८४५०) ; मिरजकर, विंचुरकर, सिरोलकर व शिंदे यांचा बत्तीसशिराळे येथे मुक्काम व जवळच करवीरकर यांची छावणी, जासूद व सेवकांना रोजमुरा देण्याबाबत, २ मोहरम (१८४५२) ; महिपतराव होळकर याचे पारिपत्यासाठी रोशनबेग, परशराम होळकर व रामदीन याच्या रवानगीचा विचार, करीमखांकडील पेंढाऱ्यांचा बऱ्हाणपुरी मुक्काम, १२ साबान, सु. १२१५/३० जुलै १८१४ (१८४७६) ; उज्यैन प्रांतात पेंढाऱ्यांचा दंगा, बऱ्हाणपुरांत हिंदुराव घाटगेतर्फे नवीन शिबंदीची सोय, १७ मोहरम/इ. स. १८१४-१५ (१८४७७) ; बऱ्हाणपुरांत पेंढाऱ्यांच्या बंदोबस्तासाठी आलेल्या परशराम होळकर याच्या कहीस भिल्लांकडून उपद्रव, मीरखांचे शेरगड येथे गमन झाल्याची आवाई, १५ र. खर/इ. स. १८१७-१८१८ (१८४७८) ; उज्यैन प्रांती गिराशांचा उपद्रव, ज्यानबत्तीस याचा भेलशावर व यशवंतराव भाऊचा नेवरी, भोरासा येथे मुक्काम, ७ मोहरम/इ. स. १८१४-१८१५ (१८४७९) ; पेंढाऱ्यांकडून उज्यैन परगण्याची नासाडी, १३ मोहरम/इ. स. १८१४-१८१५ (१८४८०) ; यशवंतराव भाऊ याजकडील लोक व शितू पेंढारी याजकडील स्वार एकत्र होऊन त्यांचा नेमाड प्रांती संचार, १४ मोहरम/ इ. स. १८१७-१८१८ (१८४८१) ; ज्यानबत्तीस याच्या पलटणाचा सोनकस येथे व यशवंतराव भाऊ याचा बाडनगर जवळ मुक्काम असून तेथे पेंढाऱ्यांचा उपद्रव, १६ मोहरम (१८४८२) ; यशवंतराव भाऊ याजकडून माळव्याची लूट, २३ मोहरम/इ. स. १८१४-१८२५ (१८४८३) ; रेवा दक्षिण भाग पेंढाऱ्यांकडून उज्याड, यशवंतराव भाऊ व शितू पेंढारी याजकडील सवारांचा रेवा उत्तर तीरावर जमाव, १३ मोहरम/इ. स. १८१४-१८१५ (१८४८४) ; उज्यैन प्रांती गिराशांचा उपद्रव, पेंढाऱ्यांसह यशवंतराव भाऊ याचा खलामे येथे मुक्काम, १५ मोहरम/इ. स. १८१४-१८१५ (१८४८५) ; नेमाड प्रांती पेंढाऱ्यांचा संचार, १५ मोहरम/इ. स. १८१४-१८१५ (१८४८६) ; पेंढारी यांचा टेभुर्णी येथून लहबारी येथे जाण्याचा बेत, परगणे चाखे येथे पेंढाऱ्यांची छावणी, नेमाड प्रांती घुगरी गांवी रोशनबेगचा मुक्काम, २६ साबान/इ. स. १८१४-१८१५ (१८४८७) ; इंदूरनजिक रामदीन याचा मुक्काम, रोशनबेक व परशराम होळकर यांचा शेंदव्याचे घाटे जाण्याचा बेत, नर्मदातिरी व भोपाळ प्रांती पेंढाऱ्यांचा जमाव, २१ साबान/इ. स. १८१४-१५ (१८४८८) ; किल्यावर गोसाव्यांचा भरणा, पुण्याकडील बातमी कळण्याकरितां रामोशीची नेमणुक, गडकऱ्यांच्या रोजमुऱ्याविषई व नेमणुकीबद्दल, २८ मोहरम, सु. १२१८/८ डिसे. १८१७ (१८४८९) ; शिंदे यांचे लष्करांतून दाजीबा, खंडोपंत व श्रीपतराव यांचे पुण्यांत आगमन, दादाजी गंगाधर यांजकडे गोविंदपंत गानू, दादा शास्त्री निंबाळकर वगैरेचे खलबत, कृष्णराव नारायण यांचे कारभाऱ्यास कैद (१८४९३) ; गंगाधर शास्त्री यांचा गायकवाड

पत्रे : चालू—

याजकडील दिवाणगिरींची वस्त्रे मिळविण्याबाबत प्रयत्न, पेंढाऱ्यांचा उपद्रव होऊ नये म्हणून फौज व इंग्रजांकडील पलटणांचे सायखेड, बहादरपुरा येथे वास्तव्य, सु. १२१४/इ. स. १८१३-१८१४ (१८४९५); ज्यानबत्तीस याचा मुक्काम भेलशावर व यशवंतराव भाऊ याचा दौलतापूरच्या घाटाखाली जीयगांव येथे असल्याचे वर्तमान, उज्जैन येथे गिराशांचा उपद्रव, इ. स. १८१३–१८१५ (१८४९९–१८५०१); घोडनदीजवळील तुर्कासह कर्णेल याचे सिरुर येथे आगमन, कर्णेल साहेबाचा विलयतेस जाण्याचा विचार, इ. स. १८१३–१८१५ (१८५०२); संस्थान भवरासें व सिरोजेच्या मामलतीबाबत मोरो हरी, विनायक महादेव सहस्त्रबुद्धे यांची खटपट व रामचंद्र बल्लाळ अवचल यांस मामला देण्याबद्दल कुंजीर यास आज्ञा करण्याविषई, इ. स. १८१३–१८१५ (१८५०३); श्री. पंचवटीतील रामचंद्राचे देवळास बैराग्याने लावलेला दरवाजा, धारवाड, हुबली येथे आलेल्या इंग्रजांच्या पलटणींत बरेच गोरे मयत व जखमी, दहीवेलच्या मामलेदाराच्या उपद्रवामुळे रयत परागंदा, ब्ऱ्हाणपुरानजिक पेंढाऱ्यांचा जमाव, जिल्हेज, सु. १२१४/डिसे. १८१३ (१८५०४); रांजणगावास पेंढारी व इंग्रज यांची चकमक, इंग्रजांचा अमरावतीस मुक्काम व पठाणांच्या फौजेचा नागपुरास जमाव, पेंढाऱ्यांचे पारिपत्य करण्याविषयी रामचंद्र चौधरीचे पत्र, ५ मोहरम, सु. १२१५/१८ डिसे. १८१४ (१८५०५); बाळाजी जनार्दन यांचेशी शेषाद्रीपंत, विठ्ठलपंत, कृष्णाजीपंत, बज्याबा शिरोळकर वगैरेंच्या भेटी, १३ सफर, सु. १२००/१७ जुलै १७९९ (१८५०६); कपूरखांच्या पलटणींचा पगारासाठीं तगादा व मुलुखांत लूट, बाळाराम याच्या पुत्राचा नामकरणविधी, इंग्रजांकडे नाचाचा कार्यक्रम, सिरोज येथे इंग्रज पेंढारी यांचे युद्ध, इ. स. १८१५-१८१६ (१८५०७); पेंढारी व पऱ्हीकडील लोकांची चिंचोडी येथे झटापट, इ. स. १८१५-१८१६ (१८५०८); परसोजी भोसले यांचे मृत्युमुळे नारोबा चिटणिस याच्या सुटकेस विलंब, विठोबा उपाध्ये यास कैद, पुण्याच्या वकिलीचे कामावर खंडो गोविंद याची नियुक्ती, मुधोजी भोसले यांचे लग्न, १७ र. खर, सु. १२१७/६ मार्च १८१७ (१८५१०); तालकम साहेबांचे चेनापट्टण येथे आगमन व हिंदुस्थानची सफर करण्याचा विचार, आकीन महंमदखांचे पुत्रास झालेल्या जखमेमुळे नबाब अजीमुद्दौला याचा संताप, पुलचेरी-कर फरासीस यांनी पुलचरीबंदर व कारीकाल येथे कोट बसवला असल्याचे वृत्त, ६ ज. खर, सु. १२१७/२४ एप्रिल १८१७ (१८५११); कपूरखां, रोशनबेग व शिलेदार वगैरेचे झुटावद येथे आगमन, ज्यानबत्तीस याजकडील मथुरा पलटण लष्करांत दाखल, रजब, सु. १२१७/मे १८१७ (१८५१२); खानदेशांत बांडे याजकडील फौज जमा व घाटाखाली पेंढारी यांचा जमाव, मेण-साहेब याचा कर्णेलाचे भेटीस जाण्याचा विचार, ३ ज. खर, सु. १२१७/२१ एप्रिल १८१७ (१८५१३); इंग्रजांचे हलकारे भरतपूरच्या किल्यावर कैद, पारखजी यास ऐवजाबाबत विचारणा, बारभाई शिलेदारांचा रुसवा काढण्यासाठीं जोग, दिवाण वगैरेचा प्रयत्न, १३ रजब, सु. १२१७/३० मे १८१७ (१८५१४); रेवाच्या दक्षिणेस पेंढारी जाणार असल्याची वार्ता, मीरखां यास प्रांतातून हाकलून देण्याविषई दिल्लीहून मटकन साहेब याची राजास सूचना, सिंगरुप याच्या बेगमेकडील पलटणीशी इंग्रज पलटणीची लढाई; खंडो मुकुंद याच्या नेमणुकेविषयी, ६ रजब, सु. १२१७।२३ मे १८१७ (१८५१५); विचुरकर व नगरकर यांचे यात्रेस गमन, पुष्कर छावणींत बापूजी शिंदे यांस ऐवजाची तूट, खंडो महादेव व अमृतराज बल्लाळ यांस नजराण्याबाबत विचारणा, ८ ज. खर, सु. १२१७।२६ एप्रिल १८१७ (१८५१६); खंडो मुकुंद, नागो त्रिंबक व मधुजी भोसले याची इंग्रज प्रकरणी श्रीमंतांचे मर्जीनुसार वर्तन करण्याची मसलत, गज्याबा गुजर याचा राग काढण्याचा शिंदे, होळकर यांचा प्रयत्न, मनभट उपाध्ये याजवर इतराजी, दाजी मोरेश्वर, भीमराव गंबाजी आणि गोरखे याजकडील वकील यांची भेट, १५ ज. खर, सु. १२१७।३ मे १८१७ (१८५१७-१८५१८); देवरीची पलटण उठऊन आणण्याविषयी बापू व्यंकटेश यास ज्यानबत्तीस याची सूचना, होळकर यांच्या महालांत बापू शिंदे यांचा दंगा, दरकदार, मानकरी, वकील वगैरेंनी केलेला दानधर्म, ६ सवाल, सु. १२१७।३० ऑगस्ट १८१६ (१८५१९); खर्चासाठी जबलपूर व हुसंगाबाद इंग्रजांच्या स्वाधीन, खंडो मुकुंद, नागो त्रिंबक व भोसले यांचे खलबत, मुधोजी भोसले यांचे चंद्रपूर येथे गमन, २८ साबान, सु. १२१८/१४ जुलै १८१७ (१८५२०); पेंढारी जमादारांचे पलायन, जोतपूर, उदेपूर, भरतपूर व लाहूरवाले शीख यांना खलिते रवाना, बापूराव शिंदे व यशवंतराव शिवाजी यांची जावदेनजिक भेट, बाळाराम यांचा मृत्यू, दौलतराव शिंदे यांच्या मातोश्रींस देवाज्ञा, २३ रमजान, सु. १२१८/७ ऑगस्ट १८१७ (१८५२१-१८५२२); बाबाजी पाटणकर, हिंदुराव, रामचंद्र भास्कर

पत्रे : चालू—

व पारखजी यांचे खलबत, देवरीचे ठाण्यांत शिबंदीचे खर्चाची तजवीज, रामराव विठ्ठल यास भेलशाबाबत ऐवजाचा तगादा, ४सवाल, सु. १२१८/१९ ऑगस्ट १८१७ (१८५२३); होळकर यांचे महालांत बापूजी शिंदे यांचा दंगा, ज्यानबत्तीस याजकडील पलटणांनी देवरीचे किल्यास लावलेले मोर्चे उठविण्याची सूचना, रामचंद्र भास्कर, द्वारकोजीराव पाटणकर याजकडून यावयाचा ऐवज, रणजीतसिंग लाहूरवाले व मुहंमदशा यांचा पिसोरे येथे सलोखा, इ. स. १८१४-१५ (१८५२४); हिंदुस्थानच्या बंदोबस्तासाठी लाटसाहेबाची येण्याची तयारी, सोपारा येथे राघोगडवाल्यांकडून बंदोबस्त, १८ र. खर, सु. १२१७/६ मे १८१७ (१८५२५); हुसंगाबादचे घाटांत पेंढारी व इंग्रजांची लढाई, नारायणराव पाटणकर यास वस्त्रे, इंग्रजांकडील बातमीस हलकार रवाना, कपूरखांचे पलायन, इ. स. १८१६-१७ (१८५२६); सिरोज, भेलशे येथे महमंद पेंढारी याजवर इंग्रजांचा छापा, गणेशपंत पिटके यास फडणीसाचे गोटात जाण्याबद्दल सूचना, इ. स. १८१४-१८१७ (१८५२७); ज्यानबत्तीस याचे अरुण येथून कूच, पेंढाऱ्यांचे पारिपत्यासाठी बाळोजी इंगळे यास पाठविण्याचा विचार, होळकरांच्या लष्करातील कारभाऱ्यांचा समेट घडवून आणण्याची आत्माराम शिवराम याजकडे कामगिरी, २७ र. खर/इ. स. १८१४-१५ (१८५२८); सिदीखान व मधोजी भोसले यांचा सलोखा, पुण्याहून थैली रवाना, इंग्रजांकडून हिंदुस्थानी लोकांची घोडदळांत भरती, इ. स. १८१६-१७ (१८५२९); बज्याबा शिरोळकर, कृष्णाबा चिटणीस बाबूराव आंग्रे, यशवंतराव घोरपडे वगैरेंचे नाना याजकडे गमन, २७ सफर (१८५३०); खंदार येथील राजा व इंग्रज यांची लढाई, वामनराव आपटे यांचा गर्व, माघ शु. १४/इ. स. १८१४-१७१५ (१८५३३).

यादी :

नवाब निजामअलीखान याने सरदारांस व बरोबरीचे लोकांस वस्त्रे, जवाहीर वगैरे दिले त्याबद्दलची, इ. स. १७८५-१७८६ (१८४६२); हैद्राबाद शहरी बनाजी हैबतराव याचे नावे रवाना झालेल्या पत्रांची, वैशाख शु. १, सु. १२१५/१० मे १८१५ (१८४९०).

पुडके क्रमांक ५

का. स. ५३ (१८५४७–१८५९९), सु. स. १२११–१२१९, इ. स. १८१०–१८१९

पत्रे :

कृष्णाजी नाईक गायकवाड—(—): मटकन याचे दिल्ली येथून शिरधन येथे गमन व बादशाहास भेटण्याचा बेत इंग्रजांकडून गोरख्याचा महाल हतस्गत व जाबसालास माणसे रवाना, माचेडीवाले राजाचा मृत्यू व भाच्यास गादी, तलावावर गोरख्यांशी झालेल्या लढाईत रुद्रपुराकडील घाटावर इंग्रजांचा ताबा, सु. १२१५/इ. स. १८१४-१८१५ (१८५४७); नुरा कुंजडा याजकडून येणाऱ्या वसुलीबद्दल नरवर येथील किल्लेदाराची तक्रार, त्रिंबकराव दाभाडे यास पुत्रप्राप्ती, २४ रमजान/इ. स. १८११-१८१८ (१८५४८); दौलतराव शिंदे व माधवसिंगराजे रामपुरेवाले यांची भेट, चिटणीसाकडून घाटगे याची समजाविशी, मटकन साहेब यास मिर्जा निजामतअली याजकडे मेजवानी, २८ र. वल, सु. १२१४/२१ मार्च १८१४ (१८५४९); नागोजी गुन्ड याचा मथुरेस जाण्याचा बेत, गोरख्यांकडील रामगडावर इंग्रजांचा कबजा, ८ र. वल, सु. १२१५/१८ फेब्रुवारी १८१५ (१८५५०); फौजेच्या खर्चासंबंधी मल्हार बक्षी याची विनंती, २९ सफर, सु. १२१४/२० फेब्रुवारी १८१४ (१८५५१); अश्वत्थ वृक्षाचा व्रतबंध, बुरूजवार सेनापती याचेशी बैठक २५ र. वल, सु. १२१५/७ मार्च १८१५ (१८५५२); गोपाळराव रघुनाथ याचा मृत्यु व उत्तरकार्य, इस्तरेची साहेब याच्याकडून समाचारास चोपदार रवाना, २० सफर, सु. १२१५/१ फेब्रुवारी १८१५ (१८५५३); यशवंतराव शिवाजी वगैरे फौजांच्या माळव्यांतील दंग्याबाबत नारो नरसी मंदोसरवाले, पाटणकर वगैरेंचे निवेदन, फौज व सरंजामाच्या मागणीसंबंधी ज्यानबतीस याचे बहादरगडाहून पत्र, २२ साबान, सु. १२१४/२० ऑगस्ट १८१३ (१८५५४); लखनूरवाला याजकडून जणेल यास भेट, ज्यानबत्तीस याच्याकडे फौज व सरंजाम पाठविण्याची आज्ञा, इंग्रजांशी

---

* **टीप.**—मूळ नावाची निश्चिती होत नाही.

दप्तर क्रमांक ३३, पुडके क्रमांक ५—चालू

पत्रे : चालू—

राजकीय : कंपनी सरकारचे सैन्य व उमाजी नाईक, भोज्या रामोशी यांची वाईचे डोंगरांतील झटापट, १८ ऑक्टोबर १८३०(२४) ; फरासिसांशी बिघाड, २६ नोव्हेंबर १८३० (७८) ; जिमिसन याजकडून रेसिडेंट यास आलल्या पत्रावरून देशमुखांच्या फितुरीचा संशय, २७ नोव्हेंबर १८३०(७९) ; शिपाई लोकांना नोकरीतून काढल्यास फितुरीचा संभव, ५ डिसेंबर १८३० (९०) ; अक्कलकोट येथे फितूर होऊ नये म्हणून हरिपंत विसाजी, जयराम वगैरेंना पुण्यास स्थानबद्ध करण्याचा गव्हर्नर मालकम याचा हुकूम, २८ डिसेंबर १८३०(१३०) ; तुळजाबाई फितुरी करण्याचा संभव म्हणून त्यांना माहेरी पाठवण्याचा रेसिडेंटचा हुकूम, ५ जानेवारी १८३१ (१४६) ; बंडखोरांशी झालेल्या चकमकीत महाराजांनी मदत न केल्याबद्दल इंग्रज अधिकाऱ्यांचे मुंबईस पत्र रवाना, इंग्रज व मराठे यांच्या दोस्तीविषयी रॉबिन्सन याजकडील माणसांचे निवेदन, २० मार्च १८३१ (२१३-२१४) ; बापू कानो फडणीस व रघुनाथ गुजर यांना फितुरी न करण्याबद्दल ताकीद, १७ जून १८३१(२९३) ; उमाजी रामोशी यास महाराजांचा आश्रय मिळत असल्याचा इंग्रजांना संशय व त्याच्या बंडाचा मोड करण्याची योजना, २० जून १८३१ (२९८), २२ जून १८३१(३०१) ; २३ जून १८३१(३०३) ; इंग्रजांचा रोमवाल्यांशी दोस्ती करण्याचा प्रयत्न, २७ जून १८३१(३०८) ; पोलंड व रुस (रशिया) यांच्या लढाई संबंधांत विलायतेत इंग्रज सरकारी वकीलांमध्ये दुमत, ६ जुलै १८३१(३१४) ; रशियन व इंग्रज यांच्यांत बिघाड झाल्यास इराणवाले रशियन लोकांस सामील होण्याचा व त्यामुळे हिंदुस्थानांत इंग्रजांस उपद्रव होण्याचा संभव, इराणमधील ब्रिटीश वकीलात करण्यास एल्फिन्स्टन व मालकम ह्यांचा नकार, ६ जुलै १८३१ (३१५) ; सैद आमद याचे बंड मोडण्यास खडगसिंग याचे मुजफराबाद येथे फौजेसह गमन, ६ जुलै १८३१(३१६) ; सतलज नदीपलीकडे रणजितसिंग शीख व इंग्रज यांच्या लढाईचा संभव, मारवाड देशांत पेंढाऱ्यांच्या बंदोबस्तासाठी इंग्रजी फौज रवाना, ७ जुलै १८३१ (३१७) ; म्हैसूरच्या कुमार राज्यांशी इंग्रजांची लढाई होऊन इंग्रज फलटणांचे पलायन, कछभुजकडे बंडाचा मोड करीत असता गुलाबखां पडला म्हणून दाजिबा घोरपडे यास नवे स्वार ठेवण्याबद्दल सूचना, ७ जुलै १८३१ (३१९) ; मुंबई सरकारच्या हुकूमावरून रिडीलसाहेब यास कैद, १० ऑगस्ट १८३१(३३६) ; रणजितसिंग याची भेट घेण्यासाठीं लाटसाहेब याचे सतलज नदीकडे गमन ४ सप्टेंबर १८३१(३५१).

राज्यकारभार : वाला मोहिते जामदार व संताजी गायकवाड यांच्या एकनिष्ठतेवर खूष होऊन त्यांना बढती, २८ सप्टेंबर १८३०(२) ; अक्कलकोटच्या बंदोबस्तासाठी जाण्याचा रेसिडेंट याचा विचार, ४ ऑक्टोबर १८३०(७) ; देवस्थानच्या जमाखर्चाचे हिशेब, ६ ऑक्टोबर १८३० (१०) ; अक्कलकोट ठाण्याचा कबजा रेसिडेंटच्या सल्ल्याने घेण्याचा विचार, ७ ऑक्टोबर १८३०(११) ;

दप्तर क्रमांक ४१, पुडके क्रमांक ३--चालू

राज्यकारभार : चालू--

यवतेश्वर येथील गुरवाच्या वहिवाटीसंबंधी विचारणा, ८ ऑक्टोबर १८३० (१२); दिवाळीचे सणासाठी रॉबिन्सन याचे बाळाजीपंत याचेमार्फत खर्चाची व्यवस्था, १६ ऑक्टोबर १८३० (२१); नहरास बंगला बांधला असल्यामुळे तिकडील सरहद्द निश्चित ठरवून देण्याविषयी रॉबिन्सन याची मागणी, २७ ऑक्टोबर १८३० (३७); शिबंदीचे स्वार देण्याबद्दल बाबाजी यांची मागणी, भोसले यांच्याकडील शिबंदीची बडतर्फी, १३ डिसेंबर १८३० (१०२); स्वारी खर्चाबद्दल गव्हर्नरचा रेसिडेंट यास हुकूम व भोसले यांच्याकडील नाणी, पुतळ्या वगैरे विकण्याची सूचना, १४ डिसेंबर १८३० (१०४); कृष्णाजी बल्लाळ मोडक यास इनाम, १४ डिसेंबर १८३० (१०८); सरदेशमुख यास धरून देण्याबद्दल कंपनी सरकारची हैद्राबाद येथे पत्रे रवाना, २७ डिसेंबर १८३० (१२७); सातारा येथे वस्ती करण्यासाठी सरकारांतून दिलेल्या जागासंबंधी नियम, २० जानेवारी १८३१ (१६४); वैराटगडाजवळ व पांडवगडचे डोंगरांत इंग्रज लोक व बेरड यांच्या चकमकी, २४ जानेवारी १८३१ (१६९-१७०); उमाजी रामोशी याचे बंड मोडण्यासाठी कंपनीकडून फौज रवाना, ८ मार्च १८३१ (२०६); उमाजी यास धरून देणारांस बक्षीसाचे अमीष, २२ मार्च १८३१ (२१७); खाजगी खर्चाचा हिशेब देण्यास विलायतेच्या बादशहाचा नकार, वेलस्लीचा राजीनामा, २६ मार्च १८३१ (२२१-२२२) उमाजी व पिरा रामोशी याचा शोध करण्याबद्दल रॉबिन्सन याचा हुकूम, २७ मार्च १८३१ (२२३); ८ मे १८३१ (२५३); १४ मे १८३१ (२६६); इंग्रजी नाणे वापरण्याबद्दलचा कायदा, ७ एप्रिल १८३१ (२२८-२३०); कंपनी सरकारचे तपासनीस व वाई पेठचातील पाटील कुलकर्णी यांच्यांत भांडण, २५ एप्रिल १८३१ (२३९); रघुनाथ जयवंत यांस मंत्रीपदाची वस्त्रे व मेजवानी, १४ मे १८३१ (२६९), १९ मे १८३१ (२७७); २१ म १८३१ (२७८); चोरांच्या पारिपत्या-संबंधी चर्चा, १६ जून १८३१ (२९१-२९२); रॉबिन्सन याच्यानंतर लाडविक याची रेसिडेंट म्हणून नमणूक, १९ जुल १८३१ (३२२); गव्हर्नराचे भेटीचे कायद्याची माहिती, २१ जुलै १८३१ (३२३); २२ जुलै १८३१ (३२४); पेन्शन द्यावयाच्या लोकांची वागणूक कळविण्या-बद्दल कलेक्टरास हुकूम, ६ ऑगस्ट १८३१ (३३४); नाना पुरंदरे यांच्या पुत्रास दिवाणगिरी देण्यास नकार, ११ सप्टेंबर १८३१ (३६५); नाणी चालविण्याबद्दल सावकारांची महाराजांस विचारणा, १८ सप्टबर १८३१ (३७०); मिलीटरी लोकांच्या पगारांत कपात करण्यास इंग्रज सरकारचा नकार, ७ ऑक्टोबर १८३१ (३९२); टंकशाळा बंद करण्याबद्दल, १३ ऑक्टोबर १८३१ (४०१).

पुडके क्रमांक ४

पत्र क्र. १९१२१ पृष्ठ क्रमांक १ ते ३६९ इ. स. १८३१-१८३२.

(प्रतापसिंह महाराज सातारकर यांच्या रोजनिशीतील नोंदी)
(१४ ऑक्टोबर १८३१ ते २ ऑक्टोबर १८३२ अखेर)

किरकोळ : सीमोल्लंघन समारंभ, १५ ऑक्टोबर १८३१ (१) :

जहागिरीसंबंधी : **(अक्कलकोटकरासंबंधी)** अक्कलकोट जहागिरीसंबंधांत रॉबिन्सन याची महाराजांशी चर्चा, १८ ऑक्टोबर १८३१ (५); अक्कलकोटकरांबाबत जिमिसन याच्याशी गव्हर्नराचा जाबसाल, २१ ऑक्टोबर १८३१ (११-१२); अक्कलकोट प्रकरणीचे धोरणासंबंधी कलमे, १० नोव्हेंबर १८३१ (३५); अक्कलकोट येथील जमाबंदीसाठी सोलापुरी जाण्याचा महाराजांचा विचार, १० नोव्हेंबर १८३१ (४०); महाराजांनी अक्कलकोटचा कारभार केल्यामुळे लावणीची नुकसानी झाल्याची जिमिसन याची तक्रार, २४ जून १८३२ (२६८); अक्कलकोट येथील जमीन महसुलास जमीनदाराचा अडथळा, ४ जुलै १८३२ (२७९); अक्कलकोट प्रकरणी रेसिडेंट लाडविक व महाराज याची चर्चा, ११ ऑगस्ट १८३२ (३२३).

दप्तर क्रमांक ४१, पुडके क्रमांक ४—चालू

इतर जहागिऱ्यांसंबंधी : कंपनी सरकारची चाकरी करण्यास रामराव डफळे जतकर यांचा नकार, सचिव प्रकरणाचा महाराजांकडून निकाल करून घेण्याबद्दल कंपनी सरकारचे पत्र, १९ ऑक्टोबर १८३१ (६-७); पंत अमात्य याजकडील सरंजाम वगैरेची जप्ती, १४ नोव्हेंबर १८३१(४६); बंडखोर उमाजी रामोशी, सोलसीकर व कोथळेकर यांना कैद केल्याचे सचिवांच्या मातुश्रींचे पत्र, २६-२७ डिसेंबर १८३१(१००–१०३); व्यंकटराव मचाले याच्या जहागिर गांवांचा अमीर नवाजखान याजकडून कब्जा, १४ एप्रिल १८३२ (१९६-१९७); सचिवांचे दत्तक प्रकरणापासून दत्तकप्रकरणी नजर घेण्याचा कायदा, १० मे १८३२(२२५); फलटण जहागिरीवरील कर्जाबद्दल महाराज व नातू यांचा पत्रव्यवहार, ८ जून १८३२(२५५); तासगांवकर यांच्याकडून मुलखास होणाऱ्या उपद्रवाचा कंपनी सरकारकडून करावयाचा बंदोबस्त, २५ जून १८३२(२७१); बाबाजी आंग्रे याची कैद व कंपनी सरकारांतून त्याच्या मुलखाचा बंदोबस्त, २ ऑगस्ट १८३२(३०६); लक्ष्मीबाई प्रतिनिधी, अक्कलकोटकर व शिर्के यांच्यासंबंधी रेसिडेंट लाडविक व महाराज यांची चर्चा, ११ ऑगस्ट १८३२(३२२-३२३).

धार्मिक व सामाजिक : ग्रामण्याबद्दल ब्राह्मणांनी केलेल्या फिर्यादीस गव्हर्नराचा जबाब, १८ ऑक्टोबर १८३१ (५); रॉबिन्सन याचा जाहीरनामा, २१ ऑक्टोबर १८३१(११); अग्निहोत्री ब्राह्मणांना हत्तीवर बसण्याच्या अधिकाराबद्दल शास्त्रार्थ, २६ ऑक्टोबर १८३१(१९); प्रभूंचा महाराजांनी पक्ष धरल्याबद्दल पुणेकर व वाईकर ब्राह्मणांनी गव्हर्नराकडे केलल्या अर्जावर साक्ष दिल्याबद्दल नीलकंठ शास्त्री यास समज व बडतर्फी, ३१ ऑक्टोबर १८३१(२५); १५ डिसेंबर १८३१(७९-८०); ठाकूरदास शास्त्री यांजकडून कर्नाटकचे राजे व त्यांचे सोयरे यांच्या जातीतील चालिरीतिसंबंधी ग्रंथ लेखन व त्यासाठी म्हैसूर, तंजावर येथे त्यांची रवानगी, १३ डिसेंबर १८३१ (७७); १४ मार्च १८३२(१७२); ३० जुलै १८३१(३०४); महाराजांनी प्रभू जातीचा पक्ष न धरता धर्माच्या बाबतीत सर्वांना न्यायाची वागणूक देण्याबद्दल कंपनी सरकारचा जाहीरनामा, १५ डिसेंबर १८३१(७८); पुणकर ब्राह्मणांविरुद्ध बळवंतराव चिटणीस याचा कंपनी सरकारांत अर्ज, १८ डिसेंबर १८३१ (८१); उदेपुराहून तेथील रितीरिवाज धार्मिक कृत्ये क्षत्रिय जात वगैरे-संबंधी माहिती आणल्याबद्दल आप्पासाहेब यांचेजवळ शिवानंद शास्त्री याचे निवेदन व उदेपूर येथे पत्र रवाना, २२ फब्रुवारी १८३२ (१५७); १४ मार्च १८३२(१७१); शिवानंद शास्त्री यांनी ज्ञातीप्रकरणी उदेपूरहून आणलेल्या ग्रंथाबाबत चर्चा, १९ मार्च १८३२(१७६–१७८); ज्ञाती प्रकरणी करावयाच्या वर्तणुकीबद्दल गुजर, सरलष्कर, शिर्के वगैरेची चर्चा, २५ माच १८३२ (१८१-१८२); गुज्याबा गुजर व रामचंद्र मोहिते यांच्यातील सोयरिकीबद्दल कलमे, १२ मे १८३२(२२७-२२८); मशिदीतील सरकारी ताबुताच्या बंदोबस्ताची व्यवस्था, ६ जून १८३२ (२५३); शास्त्र वचनानुसार मुंबई येथे पारशी यांची पाद्री व त्यांच्या जनरलशी झालल्या मारामारीबद्दल लाडविक याचे निवेदन, १९ जून १८३२(२६३); दत्तकाच्या चालीबद्दल परशराम पंडित प्रतिनिधीचे निवेदन, ९ जुलै १८३२(२८५).

बातम्या : लाट व रणजितसिंग यांची भेट, २६-२७ ऑक्टोबर १८३१ (२१-२२); ७ नोव्हेंबर १८३१ (३२); म्हैसूरकर कुमार राजांच्या दौलतींच्या बंदोबस्तासाठी ब्रिक याची नेमणूक, १० नोव्हेंबर १८३१(३९); रॉबिन्सन रेसिडेंट याच्या जागेवर लाडविक याची नेमणूक, ११ डिसेंबर १८३१ (७३); ३१ डिसेंबर १८३१(१०५); वारीस विलायतेस गेल्यावर लाडविक याचा सातारा येथे येण्याचा बेत, पॉटिंजर याची सिंध प्रांतांत नेमणूक, लाड याच्या भेटीसाठी गव्हर्नराचे गुजराथ व अजमेर येथे गमन, १२ डिसेंबर १८३१(७४); स्पेन, पोर्तुगाल, रुस वगैरेच्या लढाईसंबंधी कर्नल याचे विलायतेत उत्तर, रुसांशी रणजितसिंग याने केलेल्या दोस्तीपासून रणजितसिंग यास परावृत्त करण्याचा लाट याचा प्रयत्न, १८ डिसेंबर १८३१(८७); हैद्राबादकरांनी लढाई केल्याखेरीज त्यांच्या कामांत लक्ष न घालण्याबाबत विलायत सरकारचा हुकूम, २० डिसेंबर १८३१(९०); रणजितसिंग तीन लाख फौजेसह येणार असल्याची बातमी, १ जानेवारी १८३२ (१०६); मालकम याचे विलायतेतील राजकीय काम, ब्रीक याची म्हैसूरच्या कमिशनवर

बातम्या : चालू––

नेमणूक, २ जानेवारी १८३२(१०७) ; नेस्बिट याची पैसे खाल्याबद्दल बडतर्फी व त्याचे जागेवर अंडरसन याची नेमणूक, २ जानेवारी १८३२(१०८) ; १३ फेब्रुवारी १८३२ (१५०) ; विलायतेस झालेल्या टोपीकरांच्या तहाबद्दल साहेब लोकांत नापसंती, ५ जानेवारी १८३२(१०९); लाट व दिल्लीच्या बादशहाची भेट, दिल्ली येथील वकिलीवर साहेबाची नेमणूक, ४ फेब्रुवारी १८३२(१४५) ; विलायतेस रयतेकडून वजीर, कामदार वगैरेंच्या घरांची जाळपोळ, बादशहाचे भावास व वेलस्ली यांना मारहाण, २२ फेब्रुवारी १८३२(१५७) ; उदेपूरकर व जोधपूरकर यांची लढाईची तयारी पाहून इंग्रजांची तहास तयारी, मुधोजी भोसले यास गादीवर बसविण्याबद्दल उदेपूरकर व जोधपूरकर यांच्याशी इंग्रजांची मसलत, ७ मार्च १८३२ (१६२–१६४); मुधोजी भोसले यांस स्वाधीन करण्याच्या इंग्रजांच्या तगाद्यामुळे उदेपूरकर व जोधपूरकर यांची लढाईची तयारी, २५ मार्च १८३२(१८२-१८३) ; राज्यकारभारांत इंग्रजांचा हस्तक्षेप टाळण्यासाठी म्हैसूरकर यांच्यातर्फे ब्रीक याची विलायतेस रवानगी, २७ एप्रिल १८३२(२१५) ; जर्मन साहेब बारन हुगल व लिजट यांचे देश पहाण्यासाठी आगमन, २० मे १८३२(२३८) ; हिंदुस्थानांत बनविलेल्या बंदुकीची व पिस्तुलाची बारनहुगल याच्याकडून मागणी, २२ मे १८३२(२३९) ; ब्रीक व म्हैसूरकर राजे यांच्यातील वैमनस्यामुळे म्हैसूरच्या रेसिडेंन्सीवर दुसऱ्याची नेमणूक करण्याची ब्रीक याची लाट यास विनंती, २५ मे १८३२(२४२) ; गव्हर्नर क्लेर यांचे पुण्यास आगमन, ८ जून १८३२(२५५) ; एल्फिन्स्टन याचे फरेंचांच्या मुलखांत प्रयाण, आदम याच्या मृत्युबद्दल ग्रँट याचे लाडविक यास पत्र, ३ जुलै १८३२(२८०) ; मलाक्का द्विपांतील लोकांशी इंग्रजांची लढाइ, मच्छीबंदर प्रांती बंड, हिंदुस्थान व चीनमध्ये इंग्रज कंपनीच्या लोकांना द्यावयाच्या सवलतीबाबत इंग्लंडच्या बादशहान केलेला करार, २३ जुल १८३२(२९४-२९५) ; बादशहास द्यावयाच्या खंडणीत सवलत मिळण्याबद्दल इराणच्या सावकाराची तेथील इंग्रज अधिकाऱ्यास विनंती, काश्मिर सुभ्यांत जबरदस्ती अंमल केल्यामुळे खड्गसिंग याचे जागी रणजितसिंग याजकडून दुसऱ्या सुभ्याची नेमणूक, इंग्रजांशी असलेल्या दोस्तीच्या बळावर मिस्तरवाल्या महंमदअली बादशहा याचा रुमवाल्यांशी बिघाड, ३० जुलै १८३२(३००) ; मद्रासच्या गव्हर्नरच्या जागी हैसूरच्या रेसिडेंटची नेमणूक, हिंदुस्थानांतील राज्यकारभारासंबंधी विचारविनिमय, पारकर प्रांतातील बंडवाल्यांच्या पारिपत्याचा विचार, ७ ऑगस्ट १८३२(३१२) ; विलायतेस बादशहाचा वजिरांशी वादविवाद, वजिरांचे नोकरीचे राजीनामे, २३ ऑगस्ट १८३२ (३३१) ; रुस व फरासिस यांचा हिंदवर स्वारी करण्याचा बेत, संस्थानच्या कारभारांतील गैरव्यवस्थेमुळे म्हैसूरकर कुमार राजाकडे ब्रिक याची कमिशनर म्हणून नेमणूक, २१ सप्टेंबर १८३२(३५७); इराणवाल्यांशी झालेल्या लढाईत शिखांचा पाडाव व इंग्रजांचा शिखांना मदत करण्याचा विचार, २६ सप्टबर १८३२(३६०).

महाराज व इंग्रज संबंध : गव्हर्नराच्या महाराजावरील मर्जीबद्दल रॉबिन्सन याच बाळाजी नातू याच्याशी बोलण, लाडविक याचा महाराजांच्या भेटीस येण्याचा विचार, २३ ऑक्टोबर १८३१ (१५-१६); इंग्रजी मुलखांचा वसूल कमी होत असल्याबद्दल रॉबिन्सन याची विचारणा, १४ नोव्हेंबर १८३१ (४४) ; शेतीस व राहण्यास रयताव्याने जमीन व जागा देण्याबद्दल कर्णल याची महाराजाजवळ विनंती, १९ डिसेंबर १८३१(८८) ; रॉबिन्सन साताराच्या रेसिडेंटीवरून विलायतला जाणार असून त्या जागी मुंबईहून लाडविक याची नेमणूक, २९ डिसेंबर १८३१(१०५) ; रॉबिन्सन याचे विलायतेस गमन, ८ जानेवारी १८३२(१११) ; महाराजांना विलायतेस येण्याच्या केलेल्या आमंत्रणाबद्दल रॉबिन्सन कलेक्टर व महाराज यांची चर्चा, १० जानेवारी १८३२(११४) ; उमाजी रामोशी यास धरून दिल्याबद्दल जान्या, काल्या, व आन्या रामोशी यांना जिब्रीन साहब यांच्याकडून गुन्ह्याची माफी, १४ जानेवारी १८३२ (११६) ; कोल्हापूरकर व अंडरसन यांची भेट, हिंदु व इंग्रज दोस्तीबद्दल महाराज व रेसिडेंट चर्चा, १४ मार्च १८३२(१७३) ; मुलखाच्या वसुलीसाठी इंग्रज अधिकारी नेमण्याबद्दल महाराजांना रेसिडेंटचा सल्ला, २७ एप्रिल १८३२ (२०९) ; महाराजांशी दोस्ती ठेवण्याचा लाडविक व कल्यार यांचा मनोदय, ३ जुलै १८३२ (२८१); राज्यकारभार महाराजांचे स्वाधीन करण्याचा कंपनी सरकारचा विचार, २३ ऑगस्ट १८३२(३३१) ; गव्हर्नर कल्यार याचे भेटीचा समारंभ, ३ ऑक्टोबर १८३२(३६८–३६९).

दप्तर क्रमांक ४१, पुडके क्रमांक ४—चालू

महाराजांचे (छत्रपती) नित्याचे कार्यक्रम : (खालील पृष्ठांची तारीख १४ ऑक्टोबर १८३१ ते २ ऑक्टोबर १८३२ अशी आहे.)

दप्तर क्रमांक ४१, पुडके क्रमांक ४--चालू

राज्यकारभारासंबंधी : चालू--

रणजितसिंग व लाट साहेब यांची सतलज नदी अलीकडे भेट, १३ फेब्रुवारी १८३२ (१४९); उमाजी रामोशी व सोलसीकर यांना फांशीची शिक्षा, ३ एप्रिल १८३२(१८७) ; शिक्षणाबद्दल हुकूम, १४ व १६ एप्रिल १८३२ (१९७-२००) ; चोरांच्या बंदोबस्ताबद्दल मनरोल याने केलेल्या कायद्याबद्दल जवाब, २७ एप्रिल १८३२ (२१६-२१८) ; वतनाच्या खरेदीविक्रीसंबंधी जाहीरनामा, १२ मे १८३२(२३०) ; गव्हर्नर क्लेर याचे पुण्यास आगमन, ८ जून १८३२ (२५५) ; फरासखान्याचे सरंजामाबद्दल व भाड्याविषयी जाहीरनामा, २१ जून १८३२ (२६६) ; गावखर्चातून शिबंदीखर्च करण्याचा इंग्रज कलेक्टरचा हुकूम, २४ जून १८३२(२६८); सातारा येथे तयार होणाऱ्या व बाहेरून येणाऱ्या जिनसांबाबत जाहीरनामा, २४ जून १८३२ (२७०).

दप्तर क्रमांक ४२

पुडके क्रमांक १ ते ५

पुडके क्रमांक १

पत्र क्र. १९१२२. पृष्ठे सं. १ ते ३६१, इ. स. १८३२-३३.

(प्रतापसिंह महाराज सातारकर यांच्या रोजनिशीतील नोंदी ४ ऑक्टोबर १८३२ ते २१ ऑक्टोबर १८३३).

आर्थिक :

मंदीमुळे वसुलीवर परिणाम, १२ ऑक्टोबर १८३२ (१३) ; अमेरिकेतून इंग्लंडमध्ये येणाऱ्या सोने, रुपे वगैरेची आवक बंद, हिंदुस्थानांतील मामलती खर्चात कपात करण्याच्या शक्याशक्यतेबाबत कंपनी सरकारची सूचना, १९ जुलै १८३३ (२७४–२७७).

किरकोळ :—जर्मन रहिवाशांची विजापूर येथे भेट, ९ नोव्हेंबर १८३२ (३८) ; देवी काढण्याकरिता डॉक्टरांची नेमणूक, १० नोव्हेंबर १८३२ (३९) ; प्रतिनिधींच्या खाजगी भांडणांत साहेबाची मध्यस्थी, २७ नोव्हेंबर १८३२ (६१) ; राममोहन रॉय यांचे मुंबईत आगमन होणार असल्याची बातमी, ८ जानेवारी १८३३ (११०) ; हैद्राबादच्या दिवाणाचा मृत्यु व मृत्युपत्राची व्यवस्था, २८ जाने. १८३३ (१२६) ; बाळाजीपंत नातू यानी लांच घेतली या आरोपाचे खंडन, १ एप्रिल १८३३ (१८१) ; टांकसाळी बंद करण्याच्या इंग्रजांच्या हुकुमाची अंमलबजावणी, २४ एप्रिल १८३३ (२०१) ; इंग्रजांकडील, करवीर येथील रामराव याची महाराजांशी भेट घेण्याची इच्छा, १४ जुलै १८३३ (२६६) ; बायजाबाई शिंदे हिचा दत्तकपुत्र जनकोजी याचेशी तंटा व लढाई, ३१ जुलै १८३३ (२९०) ; दुर्गाबाईचा (रामचंद्र भाऊ यांची पत्नी) मृत्यु झाल्याची वार्ता, ७ ऑगस्ट १८३३ (२९५) ; अमरसिंग शिर्के याजवर कांही दोषारोप, २३ सप्टेंबर १८३३ (३३३) ; सृष्टी चमत्कार घडल्याचे उदाहरण, ८ ऑक्टोबर १८३३ (३४६) ; गव्हर्नर (लॉर्ड क्लेअर) विलायतेस जाणार असल्याचा बोलवा (३५७) ; निरनिराळ्या ओतीव तोफांचे नमुने, २० ऑक्टोबर १८३३ (३६०).

खाजगी :

वॉर्डन याच्या मेजवानीप्रसंगी माणकाचा जडाव असलेल्या सोन्याच्या गोफाची भेट, ८ ऑक्टोबर १८३२ (४) ; महाराजांच्या स्तुतीवर गव्हर्नरांचे इंग्रजीतील भाषण, १२ ऑक्टोबर १८३२ (९) ; गव्हर्नरांना महाराजांविषयी वाटणारा आदर, १२ ऑक्टोबर १८३२ (१३) ; महाराज व एल्फिन्स्टन यांच्यातील घनिष्ठ संबंध, २७ ऑक्टोबर १८३२ (२७) ; शहाजी भोसले यांस फक्त विद्याभ्यासच शिकविण्याबाबत बाळशास्त्री यास हुकूम, १३ डिसेंबर १८३२ (८४) ; बाळशास्त्री यानी कसे वागावे यासंबंधी छत्रपती महाराजांच्या सूचना, ३ जानेवारी १८३३ (९८) ; आवर्षणामुळे भोसले घराण्याची घरखर्चात कपात, ५ जानेवारी १८३३ (१०६) ; उदेपूर घराण्याशी शरीरसंबंध जोडण्याची महाराजांची अतीव इच्छा, १ फेब्रुवारी १८३३ (१३२-१३३) ; शाहू महाराज मेहनती व चाणाक्ष नजरेचे होते याबद्दलचा पुरावा, ११ मार्च १८३३ (१७१) ; इंग्रजांच्या गैरवागणुकीबाबत प्रतापसिंह महाराजांची विलायतेत तक्रार, २३ जून १८३३ (२४७) ; चिमणाजी शिर्के यास प्रायश्चित देऊन ज्ञातीत घेण्याचा विचार, ३० जून १८३३ (२५७) ; शिवानंद शास्त्री यांचा सत्कार, ६ सप्टेंबर १८३३ (३२०).

छत्रपती व रेसिडेन्ट :

खर्चात करावयाच्या कपातीबाबत रेसिडेंट लाडवीक याजबरोबर चर्चा, १८ ऑगस्ट १८३३ (३०५), मुतालिकाने करावयाच्या कारभाराविषयी काहीं सूचना, २६ ऑगस्ट १८३३ (३०९).

छत्रपतींचे नित्याचे व्यवहार :

(खालील पृष्ठांची ४ ऑक्टोबर १८३२ ते २१ ऑक्टोबर १८३३ ही तारीख आहे.)

खाजगी :

१, ३, ५, १५-१६, १९-२२, २९, ३२, ३५, ३७, ४२, ४७-५२, ५६, ६५-६७, ७४, ७८-८२, ८६, ८८-९०, ९४-९७, १११-११६, ११९-१२२, १२४, १४२-१४४, १५६-१५८, १६०-१६७, १६९-१७०, १७२-१७८, १८२-१८४, १८६-१९०, १९२-१९३, २०३-२०५, २०७-२०८,

दप्तर क्रमांक ४२, पुडके क्रमांक १—चालू

खाजगी : चालू—

२१०-२१२, २१४-२२०, २२५-२३२, २३४-२३८, २४०-२४५, २५१-२५६, २५८-२६२, २६५, २६७-२७१, २८४-२८८, २९१, २९८, २९९, ३०६-३०८, ३१२-३१६, ३१८-३१९, ३२१-३२२, ३२४-३२५, ३२७-३३१, ३३४-३४५, ३४८-३४९, ३५१-३५५.

धार्मिक :

६८, ११३, १२५, ३५९.

राजकारण :

२५, २६, १४१, १४८, १४९, १५१-१५५, १९९, २००, ३०१-३०४.

राज्यकारभार :

२३, ४५-४६, ५३, ५८-६०, ६२-६३, ७०, ८३, ९२, ९९, १०१-१०५, १३५-१३७, १८०, १९५-१९७, २०६, २४८, २६३-२६४, २७३, २७९-२८३, २९७, ३१०-३११, ३६१.

सामाजिक :

७-८, ११-१२, २५, ४४, १६८, २२२, २७८, २९३-२९४, २९६, ३१७, ३२३, ३५६.

हिशेब :

३३, ४०, ५४, ५५, १०८-१०९, १२७-१३१, १३४, २१३, ३५०.

जहागिरविषयक :

जहागिरदार वगैरे लोकांच्या वहिवाटी कशा ठरवाव्या व ठेवाव्या यासंबंधीचे इंग्रजांचे मार्गदर्शन, १२ फेब्रुवारी १८३३ (१५०).

धार्मिक :

धर्मशास्त्रार्थाच्या निर्णयरूपी ग्रंथाचे तपशीलवार निवेदन, १२ नोव्हेंबर १८३२ (४३) ; कर्नाटकी भाषेतील वेदोक्त धर्मग्रंथाबाबत व विजापूर येथील गोलघुमट व जुम्मा मशीद यांची डागडुजी, २८ नोव्हेंबर १८३२ (६४) ; ज्ञातीसंबंधांतील व्यवहार शास्त्रार्थ (६८) ; ज्ञाती-प्रकरणसंबंधांत वेदांचे खोटे आधार दऊन निवाडा करण्याचा ब्राह्मणांचा अश्लाध्य प्रयत्न, ६ डिसेंबर १८३२ (७५) ; सणांच्या खर्चावर इंग्रजांकडून बंदी, २८ डिसेंबर १८३२ (९३) ; कर्नाटकांत क्षत्रिय ज्ञातीचे राजे वेदोक्त कर्म करीत असल्याची माहिती, ३१ मार्च १८३३ (१७९) ; ज्ञाती-कर्माबाबतचे वेदोक्त ग्रंथांच्या आधारे विवेचन, २ मे १८३३ (२०९) ; कोल्हापूरकर, नागपूरकर वगैरेमधील ज्ञातीव्यवहारविषयीचा पत्रव्यवहार, १ जून १८३३ (२३३) ; सुतक पाळण्याबाबत ज्ञातीतील अधिकाराची कक्षा यावर निर्णय, २४ जून १८३३ (२४९) ; चिमणाजी शिर्के यास प्राय:श्चित देऊन ज्ञातीत घेण्याचा विचार, ३० जून १८३३ (२५७) ; कोल्हापूरकर भोसले यांनी पाळलेल्या कांहीं धार्मिक रीतिरिवाजांचा उल्लेख, ३० जुलै १८३३ (२८९) ; ज्ञातीव्यवहार-विषयीचा तंटा, ३ ऑगस्ट १८३३ (२९२) ; शिर्के व गायकवाड यांचेमधील लग्नसंबंधाबाबतचा वाद, २३ सप्टेंबर १८३३ (३३२) ; ज्ञाती प्रकरणाविषयी गुंजाबा गुजर यांचे पत्र, ८ ऑक्टोबर १८३३ (३४७) ; चातुर्वर्ण्याची कामे व चालू परिस्थितीतील आचारहीनता, १९ ऑक्टोबर १८३३ (३५८).

न्याय :

लहान गुन्हेगारीची चौकशी पेटचास व मोठ्या गुन्हेगारीची चौकशी हुजूरकडे होण्याची पद्धत, ५ ऑक्टोबर १८३२ (२) ; ज्ञातीप्रकरणाविषयी न्याय करण्याकरितां शिवानंद यांची उदेपूर येथे रवानगी, २३ जानेवारी १८३३ (१२३) ; पोलिसांवर दगडफेक करणारास गोळी घालून ठार मारण्याची शिक्षा, २२ एप्रिल १८३३ (१९८).

राजकीय :

अमिराच्या दर्ज्याबाबत मालकम, वेलस्ली व एल्फिस्टन यांच्यामधील दुफळी (१०) ; जोधपूर-वाले व इंग्रज यांचा बिघाड झाल्याची अफवा, १२ ऑक्टोबर १८३२ (१४) ; मुंबईच्या आसपास गोऱ्या लोकांच्या संशयित जहाजांचा वापर, १८ ऑक्टोबर १८३२ (१८) ; छत्रपति, पेशवे, शिंदे, होळकर वगैरेंच्या आपसांतील संबंधाबाबत महाराजांचे मत, २६ ऑक्टोबर १८३२ (२४) ; अरब बादशहाच्या युद्धविषयक हालचाली, ३ नोव्हेंबर १८३२ (३४) ; रूस व फरासीस यांजकडील बातमीपत्र, ७ नोव्हेंबर १८३२ (३६) ; १८१८ चे लढाईपूर्वीची मोर दीक्षित व एल्फिस्टन यांची विश्रामबागवाड्यांतील भेट, १० नोव्हेंबर १८३२ (४१) ; हिंदुस्थानातील राजेरजवाड्यांचा

दप्तर क्रमांक ४२, पुडके क्रमांक १—चालू

राजकीय : चालू--

रूसवाल्यांच्या मदतीने बंड करण्याचा प्रयत्न, २ डिसेंबर १८३२ (७२) ; हिंदुस्थानांत येणाऱ्या रूसवाल्याशी बोलणी करण्याकरितां एल्फिस्टन येणार असल्याची वदंता, ५ डिसेंबर १८३२ (७३), बंगलोर येथील बंडाची चर्चा, पलटणीतील लोकांस पुरेसे रोजगार दिले असतां फितूर होणार नाही असा अंदाज, ६ डिसेंबर १८३२ (७६-७७) ; महाराज व मालकम यांचेवर लाच खाल्ल्याचा आरोप, १३ डिसेंबर १८३२ (८४) ; मुंबई येथील दारूखान्यास आग लावण्याचा प्रयत्न, १५ डिसेंबर १८३२ (८७) ; बायजाबाई शिंदे हिच्याशी बेबनाव, रूसवाल्यांच्या हालचाली, रूसवाले क्रूर आहेत असे मराठी माणसाच्या मनावर ठसविण्याचा प्रयत्न, २५ डिसेंबर १८३२ (९१) ; म्हैसूरच्या राज्यावर खोटे बालंट आणून त्याला बदनाम करण्याची रेसिडेंट याची कपटनीति, ११ फेब्रुवारी १८३३ (१४५-१४६) ; लखनौ येथील बंड करणाऱ्या लोकांस बंड न मोडल्यास लखनौ ताब्यांत घेऊ अशी इंग्रजांची धमकी, रूसवाल्यांच्या फौजेशी सामना करण्याची हिंमत रणजितसिंग याचे फौजेत आहे किंवा नाही याबाबत शंका, १९ मे १८३३ (२२३) ; रूसवाले यांच्या संभाव्य हल्याचा मार्ग, कौन्सिलांत हिन्दू लोक घेण्याचा विचार, १९ मे १८३३ (२२४) ; रूसवाल्यांच्या संभाव्य हल्यास तोंड देण्याकरितां प्रतापसिंह महाराजांकडे फौज आहे किंवा नाही याविषयी इंग्रजांची विचारणा, २३ जून १८३३ (२४६) ; पुणेकर व दक्षिणात्य ब्राह्मण यांच्यावर इंग्रजांचा संपूर्ण अविश्वास, १८ जुलै १८३३ (२७२) ; इंग्रज व मराठे यांच्या राजनैतिक संबंधाबाबत प्रतापसिंह महाराज यांचे सडेतोड व निभिड विचार, १४ ऑगस्ट १८३३ (३००).

राज्यकारभार :

बेकायदा जहाज वाहतुकीस बंदी, ३१ ऑक्टोबर व १ नोव्हेंबर १८३२ (३०), (३१) ; मुंबई व मद्रास येथे कौन्सिलस स्थापण्याबाबतचे विचार, ४ जानेवारी १८३३ (१००) ; लाचखाऊ नोकरांची योग्य प्रकारे कसून चौकशीची आवश्यकता, ६ जानेवारी १८३३ (१०७) ; राज्यांतील दरवड्यांचा बंदोबस्त, इंग्रजी व मराठी हुकुमांची अंमलबजावणी, ७ एप्रिल १८३३ (१८५) ; किरकोळ सूचनावजा पत्रे पुणे येथील एजंटाची इंग्रजीतून आल्याची नोंद, १९ एप्रिल १८३३ (१९४) उदेपुराहून शिवानंद शास्त्री यांचे वार्तापत्र, २४ एप्रिल १८३३ (२०२).

सातारा शहर :

शहर सातारा येथे नवीन पेठांची वसाहत, २३ नोव्हेंबर १८३२ (५७) ; शहरांतील बंदोबस्ता-करितां वयोवृद्ध माणसांची नेमणूक, १५ एप्रिल १८३३ (१९१).

(प्रतापसिंह महाराज सातारकर यांच्या रोजनिशीतील नोंदी)

सामाजिक :

भेटीप्रसंगी मानाप्रमाणे विडे देण्याच्या चालीरीती, १२ ऑक्टोबर १८३२ (६) ; गुलामगिरीची पद्धत नष्ट होत चालल्याबाबत, २९ ऑक्टोबर १८३२ (२८) ; जहागिरदाराने दत्तक घेऊ नये या नियमाचा भंग केल्याबाबत आप्पाजी निपाणीकर यांच्या जहागिरीच्या जप्तीचा हुकूम, १ डिसेंबर १८३२ (६९) ; तरुण मुलांतील बदफैलीपणाला आळा घालण्याचा प्रयत्न, २ डिसेंबर १८३२ (७१) ; तोरगलकर शिंदे यांची मुलगी व अक्कलकोटकर भोसले यांचा मुलगा शहाजी यांचा शरीरसंबंध जुळवून आणण्याची योजना, १७ जानेवारी १८३३ (११७) ; (११८) ; ज्ञाती व्यवहारांतील परस्पर संबंधांचे व त्यांतील मर्यादांचे सविस्तर विवेचन, २ फेब्रुवारी १८३३ (१३८–१४०) ; एल्फिन्स्टन व रॉबिन्सन यांच्याकडे मराठीतील ज्ञाती प्रकरणाविषईच्या नकलांची रवानगी, १८ फेब्रुवारी १८३३ (१५९) ; सामाजिक चालीरितीनुसार गायकवाड व शिर्के घराण्यांचे एकमेकांत लग्नसंबंध होण्याची अशक्यता, १७ मे १८३३ (२२१) ; जातीने पावन करून घेतल्याशिवाय स्वतःचे मुलाशीसुद्धां अन्नव्यवहार न करण्याचा अमरसिंग याचा निश्चय, १२ जून १८३३ (२३९) ; वकिलाच्या बंगल्यावरून घोड्यावर बसून जाण्यास बंदी, १५ सप्टेंबर १८३३ (३२६).

पुडके क्रमांक २

पत्र क्र. १९१२३, पृष्ठे सं. १-३१३

इ. स. २२ ऑक्टोबर १८३३—९ ऑक्टोबर १८३४.

(प्रतापसिंह महाराज सातारकर यांच्या रोजनिशीतील नोंदी)

(२२ ऑक्टोबर १८३३ ते ९ ऑक्टोबर १८३४)

जहागिरदार : शहाजी भोसले अक्कलकोटकर यांची रेसिडेंट लॉडविक यांजकडे जेवणखाण्याचे बंदोबस्ताविषयी फिर्याद, २४ ऑक्टोबर १८३२ (३) ; बज्याबा निंबाळकर व सर्वोत्तम बाबुराव यांना वर्डिन यांस भेटण्यास बंदी, २५ ऑक्टोबर १८३३ (१०) ; सर्वोत्तम बाबुराव याचे सातारा येथून पुण्यास पलायन, १ नोव्हेंबर १८३३ (१९) ; अक्कलकोटकर यांच्या बंदोबस्ताबद्दल जॉन्सनची महाराजांस सूचना, २५ नोव्हेंबर १८३३ (४६).

छत्रपति व रेसिडेन्ट : गँट याच्या भेटीबाबत एल्फिस्टन याचे विलायतेहून पत्र, लॉडविक रेसिडेंट झाल्याबद्दल महाराज सरकारांत खुषी, २८ फेब्रुवारी १८३४ (१२६).

छत्रपतींचे नित्याचे व्यवहार : (खालील पृष्ठांची २२ ऑक्टो. १८३३ ते ९ ऑक्टो. १८३४ ही तारीख आहे.)

जमाबंदी : ३८, ३९, ४१-४५, ४७-५९.

जहागिरदारविषयक : १४०-१४३, १६२, २३९-२५१.

न्यायदान : ११-१८, ८२-९१, ९३-१२५, १४९-१६१, १६३-१७३.

राज्यकारभार : १, २, ५, ९, २०-३१, ३३-३६, ६१-८०, १२९-१३८, १४५-१४६, १७५-१७७, १७९-१९६, १९८-२२२, २२४-२३८, २५२-२७३, २७५-२७९, २८१-२८३, २८५-२८६, २८८-३१३.

धार्मिक : ज्ञाती धर्मानुसार लोक न वागल्यास त्यांचेकडून दंड घेण्याचा विचार, ११ मार्च १८३४ (१४७).

बातमी : विलायतेत गुलाम लोकांचा दंगा होण्याचा संभव, ८ मार्च १८३४ (१४४),

भारतीय संस्थाने : हैद्राबादचे राज्य कंपनी सरकारचे मते चालवण्याची योजना, २४ ऑक्टोबर १८३३ (६) ; रणजितसिंग याजकडील वकील कलकत्त्यास लॉट साहेबांकडे जाणार असल्याची बातमी, २५ ऑक्टोबर १८३३ (७) ; निजामाच्या राज्यांत कंपनी सरकारने नेमलेल्या दिवाण चंदूलाल यांजकडून रयतेचा छळ, २५ ऑक्टोबर १८३३ (८) ; शिंदे यांच्या नावापुढे सरकार हे विशेषण लावण्यास इंग्रजांकडून मनाई, ९ नोव्हेंबर १८३३ (३२) ; ग्वाल्हेर येथे फितुरी व बंडवाल्यांचा बंदोबस्त, १४ नोव्हेंबर १८३३ (३७) ; भूजवाले नबाब वारल्यानंतर त्यांचा मुलगा व भाऊ यांच्यात परस्पर लढाई, १४ डिसेंबर १८३३ (६०) ; रणजितसिंग याचा आजार व शीख लोकांचे लुधियानांत आगमन होण्याची बातमी, १२ मार्च १८३४ (१४८) ; रणजितसिंग याजकडून मथुरेच्या ब्राह्मणांना शनिग्रहाच्या सुवर्ण पुतळ्याचे दान व त्यांची इंग्रजी हद्दीत पाठवणी, ब्रम्हदेशच्या जुलमी राजाच्या कारभारांत पडण्यास रेसिडेंट यास बंदी, १५ एप्रिल १८३४ (१७४) ; अजमेर येथे लॉट साहेबाचा जोधपूरच्या कारकुनाशी तंटा, राजा मानसिंग पदभ्रष्ट होण्याचा संभव व इंग्रजांशी लढाई करण्याचा संभव, २१ एप्रिल १८३४ (१७८) ; दौलतराव घोरपडे यांना पुण्यास घरीं राहण्याबद्दल इंग्रजांचा हुकूम, हरजी होळकर याने जुने कारभारी कैद करून त्याजकडे लावलेला पट्टीचा तगादा व इंग्रजांची त्याबाबत मुग्धता, १८ मे १८३४ (१९७) ; रणजितसिंग याचे मृत्युनंतर हिंदुस्थानांत लढाई होण्याचा संभव म्हणून रेसिडेंट याची महाराजांशी चर्चा, १९ जून १८३४ (२२३) ; हैद्राबादमध्ये प्रजेवर होणाऱ्या जुलुमाचा बंदोबस्त करण्याची इंग्रजांकडे कामगिरी, ग्वाल्हेर येथे शिंदे यांच्या पलटणींत बंड, १९ ऑगस्ट १८३४ (२७४) ; जोधपूरकरांशी मुधोजी याची लढाई, ३१ ऑगस्ट १८३४ (२८०) ; जोधपूर येथे इंग्रज पलटण रवाना व सिंध नदीपलीकडे फौज जमा होणार असल्याची बातमी, ७ सप्टेंबर १८३४ (२८७).

दप्तर क्रमांक ४२, पुडके क्रमांक २---चालू

राजकीय :

किल्ला व जलमंदिर बघण्यासाठी आलेल्या मुंबईच्या साहेबांची भेट न घेण्याबद्दल महाराजांस सूचना, १७ नोव्हेंबर १८३३ (४०); इंग्रज दरबारांत येण्यास बाळाजीपंत नातू यास मनाइ, ४ सप्टेंबर १८३४ (२८४).

राज्यकारभार :

ग्रँट याचा भाचा डॉक्टर पामलर यांस हिंदी शिकण्याची सूचना, २४ ऑक्टोबर १८३३ (४); चीनचे मुलखांत व हिंदु देशांत पूर्ववत् कंपनीचा व्यापार चालू ठेवण्यासंबंधी विचार, २५ ऑक्टोबर १८३३ (७); आधारवाडी येथे विहिरी खणण्याचा हुकूम, वाघाची शिकार केलेल्या लोकांस बक्षीस, ९ जानेवारी १८३४ (८१); प्रतापसिंग महाराजांचा एका वर्षाचा जमाखर्च, १ माच १८३४ (१२७-१२८); टांकसाळीतून पटवर्धन वगैरेकडून खोटया रुपयांची निर्मिती, ८ मार्च १८३४ (१३९).

शहर सुधारणा :

सातारा येथील आमदानी पुण्यापेक्षा चांगली असल्याबद्दल वॉर्डनच्या बायकोचे मत, १९ जून १८३४ (२२३).

पुडके क्रमांक ३

पत्र क्र. १९१२४, पृष्ठ सं. १-३६३ इ. स. ११ ऑक्टोबर १८३४---३० सप्टेंबर १८३५.

(प्रतापसिंह राजे सातारकर यांच्या रोजनिशीतील नोंदी.)

छत्रपतींचे नित्याचे व्यवहार :

(खालील पृष्ठांची ११ ऑक्टो. १८३४ ते ३० सप्टे. १८३५ ही तारीख आहे.)

जहागिरदारप्रकरणी :

७, १०, १३, १६, १४६-१४७, १५७, १८२, २९४, ३३८, ३४१, ३४३-३४४, ३४८, ३५३, ३६१.

धार्मिक व सामाजिक :

९, २९, १२०, १३९-१४०, १७६, २१०, २१९.

महाराज व इंग्रज संबंध :

१५, ३०, ७३-७४, ८२, ११५, १२७, १३१, १३४, १३७-१३८, १४१, १५२, १६१-१६२, १६८, १७५, १७७, १७९-१८१, १८५-१८९, १९१, १९३-१९४, १९६, १९८-१९९, २०१-२०३, २०५, २०७-२०८, २११, २१४-२१५, २१७-२१८, २२६, २२८-२२९, २३२, २३५, २४३, २५३, २५५, २५७-२५८, २७३, २७५-२७६, २८०, २८३, २८५, २८९-२९०, २९२-२९३, ३०३, ३०५, ३०९-३१०, ३१२-३१३, ३२५, ३२७, ३५८-३५९.

महाराज खाजगी :

१९-२०, ३५-३६, ४०-४१, ५०-५१, ५३, ५५-५६, ७९, ९२, १०३, १५६, १५८, १६७, २२२, ३०८.

राज्यकारभार :

१-२, ८, १४, २५, २७-२८, ३१-३२, ३७-३९, ५४, ६१-६२, ७२, ७५-७८, ८०, ८३-८५, ८७, ९४-९८, १००-१०१, १०५-१०६, १०८-११४, ११६-११९, १२१-१२६, १२८-१३०, १३२-१३३, १४२-१४३, १४८, १५०-१५१, १५३, १५९, १६५-१६६, १७३, १८३-१८४, १९०, १९२, २०६, २०९, २१२-२१३, २२०-२२१, २२३-२२५, २२७, २३०-२३१, २३४, २३६-२४२, २४४-२४६, २४९-२५२, २५४, २५६, २६९-२७१, २७३-२७४, २७७, २७९, २८१-२८२ २८४, २८८, २९१, २९५, २९६-२९८, ३०१-३०२, ३०४, ३०७, ३११, ३१४, ३१६-३१८, ३२०-३२४, ३२६, ३२८-३३०, ३४०, ३४२, ३४६-३४७, ३५०-३५२, ३५५-३५७, ३६०, ३६२-३६३.

दप्तर क्रमांक ४२, पुडके क्रमांक ३—चालू

जहागिरदारप्रकरणी :

रामराव डफळे यांचा मृत्यु, जहागिरदाराच्या मृत्यूनंतर औरसपुत्र असतानाहि जहागिरीची जप्ती करण्याची पद्धत, ४ ऑगस्ट १८३५ (३३१–३३६).

(प्रतापसिंह राजे सातारकर यांच्या रोजनिशीतील नोंदी)

धार्मिक व सामाजिक :

देशावर संकट येतेसमई श्री. त्र्यंबकेश्वरच्या कुंडातून ज्वाला निघत असल्याचे नाशिकहून आलेल्या गृहस्थाचे मत, १८ ऑक्टोबर १८३४(११) ; गुजर, मोहिते, पवार यांच्या गोत्रासंबंधी चौकशी, नोव्हेंबर १ १८३४(२४) ; शास्त्री मंडळाने निःस्वार्थीपणे ज्ञातीसंबंधी निर्णय देण्याची व मद्य, मांस सेवन करणारे व जातीबाह्य वर्तन करणारे ब्राह्मण यांच्याकडून दंड घेण्याची सूचना, १५ नोव्हेंबर १८३४(३३-३४) ; मोहिते व गुजर यांच्या सोयरिकेस मराठा जातीची मान्यता, १५ डिसेंबर १८३४(५९) ; ब्राह्मणांच्या दक्षिणेबद्दल इंग्रजांचा हुकूम, २० डिसेंबर १८३४ (६५) ; जमनाजी महाडिक याची कन्या व शिवाजी मोहिते नागपूरकर यांच्या सोयरिकेस ज्ञातीच्या तंटचामुळे अडथळा, १५ जानेवारी १८३५(८८) ; गायकवाडांचा जांवई कदम याचे कछवे क्षत्रियांबद्दल निवेदन, १७ जानेवारी १८३५(८९) ; नाना व रावजी महाडिक यांच्यावरील बहिष्काराबद्दल महाडिक मंडळी व ज्ञातीस ताकीद, शुद्राच्या संसर्गाबद्दल वाठारकर निंबाळकर यांनी प्रायश्चित घ्यावे म्हणून हरभट वाळिंबे याची विनंती, २१ जानेवारी १८३५ (९१) ; शुद्धिपत्र देण्याबद्दल वाठारकर निंबाळकर यांची महाराजांना विनंती, २५ जानेवारी १८३५(९३) ; वाठारकर निंबाळकर यांच्या शुद्धिपत्राबाबत आप्पासाहेब यांचे पत्र, २९ जानेवारी १८३५(१०२) ; सती जाण्यास इंग्रजांची मनाई, ३ फेब्रुवारी १८३५ (१०७) ; माहुली येथील श्री. भार्गवराम देवाची मूर्ती फोडल्याबद्दल इंग्रजांकडील संन्यास शिक्षा, १८ एप्रिल १८३५ (१७४) ; नीतिधर्माप्रमाणे चालण्याची शास्त्रांतील सूचना, १३ मे १८३५(२०४) ; धर्मप्रसारासाठीं व स्त्रियांच्या विद्याभ्यासासाठीं शाळेची सोय, १५ जून १८३५(२४७) ; सतीच्या चालीसंबंधी चर्चा, २० जून १८३५ (२५९–२६८) ; हिंदूंना बाटवून ख्रिस्ती करण्याचा इंग्रजांचा विचार व कर्नाटकांत पुष्कळ लोक बाटविल्याबद्दल बातमी, ३० जून १८३५ (२७८) ; यजुर्वेदी व ऋग्वेदी यांच्या कर्मासंबंधी चर्चा, क्षत्रियांचा सावित्री व ब्राह्मणांचा गायत्री मंत्र असल्याबद्दल मत, १७ जुलै १८३५ (३००) ; लग्नाच्या पद्धतीत सुधारणा करण्याची सूचना, ११ ऑगस्ट १८३५ (३१९) ; सप्तशतीच्या पाठाचे सरकारांत पठण, ५ सप्टेंबर १८३५ (३३७) ; चिमणाजी शिर्के यास जातीत ठेवण्यासंबंधी चर्चा, १४ सप्टेंबर १८३५(३४५).

बातम्या :

विलायत येथील पार्लमेंटची इमारत जळाल्याची, ११ मार्च १८३५ (१३५) ; कंपनी सरकारच्या व्यापारामुळे इतरांचे नुकसान होते म्हणून हिंदुस्थानांत कंपनीच्या व्यापारास बंदी घालण्याबद्दल व हिंदुस्थान अगर विलायतेतील व्यापार सर्वांना खुला ठेवण्याबद्दल विलायत बादशाहींत ठराव, छापखान्यामुळे हिंदु लोकांना देशावरच्या बातम्या समजून ते हुशार होतात म्हणून छापखाना बंद करण्याचा कलकत्त्यात कट, ४ ऑगस्ट १८३५(३१५).

महाराज व इंग्रज संबंध :

रॉबर्ट यांची गव्हर्नर पदावर नेमणूक, अमेरिकेच्या टापूवरील स्मिथ याची पूर्वीची गव्हर्नरपदावरील नेमणूक, गव्हर्नर क्ल्यारचे मुंबई येथे आगमन, १३ ऑक्टोबर १८३४(४–५) ; सरहद्द प्रकरणी महाराजांचे गव्हर्नर यास पत्र, मालकम याच्या स्मारकनिधीची रेसिडेंट यांजकडून महाराजांचेकडे मागणी, १४ ऑक्टोबर १८३४(६) ; गव्हर्नर भेटीची महाराजांची इच्छा, २७ ऑक्टोबर १८३४(१७-१८) ; अंडरसन विलायतला जाणार असल्यामुळे धारवाड येथील रेसिडेन्सीवर रीड याची नेमणूक, ३१ ऑक्टोबर १८३४(२२) ; महाराजांच्या राज्याच्या बंदोबस्ताबद्दल एल्फिन्स्टन याचे आश्वासन, १५ नोव्हेंबर १८३४(३३) ; आप्पासाहेब यांचे गैरवर्तन व नेमणुकेबद्दल महाराजांच्या सेनापतीजवळ रेसिडेंट याचे निवेदन, सरहद्द प्रकरणी लाडविक याचे महाराज यांना आश्वासन, बंड केल्याबद्दल अक्कलकोटकर शंकरराव सरदेशमुख यांस कैद करण्याची सूचना

दप्तर क्रमांक ४२, पुडके क्रमांक ३--चालू

महाराज व इंग्रज संबंध : चालू--

२५ नोव्हेंबर १८३४ (४२-४३) ; लांच खाल्याच्या आरोपाबद्दल लखनौ येथील रेसिडेंटची बडतर्फी व त्याबद्दल चौकशी, १ डिसेंबर १८३४(४७) ; सरहद्द प्रकरणी बाळाजीपंत नातू याजकडून माहिती मिळविण्याबाबत क्लयार यास लिहावयाचे पत्र, विलायत येथे जाण्यापूर्वी जहागिरी प्रकरणी उलगडा करण्याबद्दल एल्फिन्स्टन यास विनंती, १५ डिसेंबर १८३४(५७-५९) ; वर्तन सुधारण्याबाबत आप्पासाहेब यांस सूचना, २० डिसेंबर १८३४(६४) ; महाराजांच्या राज्यकारभाराबद्दल इंग्रजांचे अनुकूल मत, पेन्शन व सरंजामासंबंधी मुक्तता, एक सालाच्या खर्चाइतकी रक्कम शिल्लक टाकणे व कंपनी सरकारच्या सल्याने वागणे याबद्दल ग्रँट याच्या महाराजांना सूचना, स्मीथ याच्या लष्करांत बाळाजीपंत नातू यास महाराजांनी पाठविलेले पत्र, २२ डिसेंबर १८३४ (६६-७०) ; रेसिडेंट लॉडविक याचे मुंबईला गमन व मुंबईचा गव्हर्नर विलायतला जाण्यापूर्वी सातारा येथे येणार असल्याचे पत्र, १४ जानेवारी १८३५(८६) ; मुंबईचा गव्हर्नर व सर्व ठिकाणच्या इंग्रज अधिकाऱ्याच्या बदल्या, गव्हर्नर क्लयार याचा विलायतला जाण्याचा बेत, बाळाजीपंत नातू याचा मुंबईला जाण्याचा विचार, २७ जानेवारी १८३५(९९) ; सरहद्द प्रकरणी एल्फिन्स्टन याजकडून माहिती मिळण्याबाबत महाराजांची विनंती, २३ मार्च १८३५ (१४४-१४५) ; मुंबइ येथील गव्हनर पदावर ग्रँट याची नेमणूक, २६ मार्च १८३५(१४९) ; एल्फिन्स्टन याजप्रमाणेच राज्याचा बंदोबस्त ठेवण्याबद्दलचे क्लयार याचे आश्वासन, ३० मार्च १८३५(१५४-१५५) ; क्लयार याचे पत्र तहनाम्यास जोडून जपून ठेवण्याची लाडविक याची महाराज यांना सूचना, ३ एप्रिल १८३५ (१६०) ; विलायतेत पहिल्या वजिराच्या जागी वेलस्ली याची नेमणूक, पूर्वी बोनापार्ट याचा चिटणीस असलेल्या म्हाताऱ्याची फरेंचांच्या देशांत मुख्य प्रधानकीवर नेमणूक, ७ एप्रिल १८३५(१६३) ; महाराजांनी कंपनी सरकारशी दोस्ती ठेवण्याबद्दल गव्हर्नर ग्रँट याची इच्छा, १३ एप्रिल १८३५(१६९-१७०) ; नागपूर येथील अधिकारी व नागपूर येथे आलेला रेसिडेंट यांचे मतभेद, २३ एप्रिल १८३५(१७८) ; निपुत्रिक असल्यामुळे महाराजांनी दत्तकपुत्र घ्यावा म्हणून लॉडविक याची सूचना, ९ मे १८३५ (१९५) ; निंबाळकर, अक्कलकोटकर, डफळे यांचे मुलूख महाराजांनी घेतले तसेच महाराजांचे राज्य इंग्रज घेतील याबाबत चर्चा, २३ जुलै १८३५(३०६).

महाराज खाजगी :

शहाजी भोसले अक्कलकोटकर यांजकडून आलेल्या गडगणेराच्या आमंत्रणास महाराजांचा जबाब, १६ नोव्हेंबर १८३४ (३४) ; गडगणेरासाठीं खंडेराव शिर्के, रामराव मोहिते व नाना आगटे यांचेकडे महाराजांचे गमन, २८-२९ नोव्हेंबर १८३४ (४४-४५) ; शिर्के व मोहिते यांजकडील लग्नसमारंभाची माहिती, १ डिसेंबर १८३४(४६) ; महाराजांना भेटण्याच्या पटवर्धन यांच्या इच्छेबद्दल राघोपंत केशरकर याचेजवळ महाराजाचे उत्तर, २ डिसें. १८३४ (४८-४९) ; वरातीचा समारंभ, ६ डिसें. १८३४ (५२) ; विवाहाप्रित्यर्थ पाठविलेला आहेर स्वीकारण्याबद्दल चंदावरकर शिवाजीराजे यांचे महाराजांना पत्र, १ फेब्रु. १८३५ (१०४) ; उदेपूरकर राणाजी यास महाराजांकडून पोषाख रवाना, १३ एप्रिल १८३५ (१६९-१७०) ; राज्याभिषेकसमई लागणाऱ्या चारी समुद्राच्या पाण्यासंबंधी माहिती, २३ सप्टें. १८३५ (३५४).

राजकारणी :

सयाजी गायकवाड यांच्या नांवे शिक्यासह खोटी पत्रे रुसवाल्यास लिहून ती पत्रे धरून दिल्याबद्दल इंग्रज सरकारांतून बक्षीस मिळविण्याचा प्रयत्न केला म्हणून प्याकशा मुसलमानास इंग्रज सरकारांतून कैद, अयोध्या येथे कंपनी सरकारने अंमल चालविण्याबद्दल विलायतचा हुकूम, १३ ऑक्टो. १८३४ (३-४). जोधपूरवाल्यांचा इंग्रजांशी लढण्याचा निश्चय, सिंधवाल्यांचा जोधपूरकरांस मदत करण्याचा विचार, सिंधवाल्यांकडून सुज्यावलमुलुक याची खंडणी वसुली यासंबंधी बातमी, २० ऑक्टो. १८३४ (१२) ; सिंध व जोधपूर घेऊन रणजितसिंग, सिंधवाले यांना थक्क करून रुसवाल्यांचा हिंदुस्थानचे सहा सुभे जिंकण्याचा बेत हाणून पाडण्याचा इंग्रजांचा प्रयत्न, २० ऑक्टो. १८३४ (१७) ; नागपूर येथील कारभारासंबंधी नागपूरकर अधिकारी मुधोजी भोसले याच्या पत्रासह इंग्रजांकडे रवाना, २८ ऑक्टो. १८३४ (१८) ; विलायतच्या कारभारी मंडळाची रयतेकडून घालमेल, हुकूम दुसऱ्याचे स्वाधीन केल्यामुळे होणारा राज्य नाश, इंग्रजांचे जोधपूरवाल्यांशी लढण्यासाठीं प्रयाण व इंग्रजांच्या पराभवाच्या चिन्हाबद्दल मुंबईत बातमी, एल्फिन्स्टन

याच्या अरबस्थानांत झालेल्या पराभवाबद्दल गुप्तता, नाना फडणीस याच्या राजकारणांतील मुत्सद्देगिरीबद्दल रेसिडेंट याची चर्चा, ३१ ऑक्टो. १८३४ (२१-२३) ; जोधपूरवाल्यांशी इंग्रजांचा तह झाल्याची बातमी, ३ नोव्हें. १८३४ (२६) ; महाराजांना भेटण्याची मुधोजी भोसले नागपूरकर याची इच्छा, नागपूरकर अधिकाऱ्याकडून इंग्रजांनी घेतलेला ऐवज, जोधपूरवाल्यांकडील लेकबळचाने मानसिंग यास धरून देण्याचे आमिष दाखवून इंग्रजांचा पाडाव केल्याची बातमी, २० डिसें. १८३४ (६३-६४) ; अयोध्या येथील राजास साठ लक्षांच्या मुलुखाबद्दल इंग्रजांकडून नेमणूक, लखनौवाल्यांची हैद्राबादवाल्यांप्रमाणेच स्थिति असल्याचे किबे यांचे निवेदन, २३ डिसें. १८३४ (७१) ; रशियन व इंग्रज यांच्या लढयांत तटस्थ राहण्याचा प्रशिया, आस्त्रिया, फ्रान्स वगैरेचा बेत, रशियनांनी रुम घेतल्यास इराणशी सख्य करण्याचा इंग्रजांचा बेत, सिंधवाल्यांकडून मदत घेऊन जोधपूरवाल्यांचा पराभव करण्याचा इंग्रजांचा प्रयत्न, ५ जाने. १८३५ (८१) ; लखनौवाले यांचा मुलुख घेण्याचा इंग्रजांचा विचार असल्यामुळे आपला वकील विलायत दरबारांत ठेवण्याचा लखनौवाल्यांचा प्रयत्न, पेशावर येथे गेलेल्या नवनिहालसिंग याच्या मदतीस त्याचा आजा रणजितसिंग याचा फौजेसह जाण्याचा बेत, १९ जाने. १८३५ (९०) ; रशियन यांच्या विरुद्ध इंग्रज व फ्रेंच मिसरवाल्यांना मदत करणार असल्याची बातमी, २७ जाने. १८३५ (९९) ; काबूल येथील शहा सुजा याचा सिंधवाल्यांकडून सत्कार, अल्पवयीन जयपूरकर राजास विष घालून मारल्याबद्दल जोतराम याची दिवाणीवरून बडतर्फी, लढाईचा खर्च भरून काढण्यासाठीं जयपूरकर व जोधपूरकर मिठाचे उत्पन्न असलेली सांबर व तळी गहाण ठेवणार असल्याबद्दल बातमी, ७ एप्रिल १८३५ (१६३-१६४) ; अयोध्या येथील राजास चांगले वागण्याची उपरति व इंग्रज राज्य घेणार असल्याबद्दल चिंता, १३ एप्रिल १८३५ (१७०-१७१) ; इंग्रजांचा जोधपूरवाल्यांशी तह, १९ एप्रिल १८३५ (१७६) ; अरबस्थानांतील किरकोळ लढाया, इराण येथील वकिलाच्या सन्मानार्थ खर्च करण्याचा महाराजांचा विचार, शत्रूस आपल्या मुलुखांतून रस्ता न देण्याबद्दल शिखांचा सिंधवाल्यांवरील दबाव, ११ मे १८३५ (१९७) ; इराण येथील कंपनी सरकारकडील कामकाज रद्द करून बादशहा याजकडील वकिलाच्या मध्यस्थीने दरबारांतील कामकाज करण्याचा ठराव, विलायतेत राजपक्षीय प्रधानाची नेमणूक करून पार्लमेंटला निरोप दिल्याबद्दल रयतेचा रोष, १२ मे १८३५ (२००) ; हैद्राबादकर नबाब नासरद्दौला व इंग्रज यांची घासदाणा व चौथाईसंबंधी बोलणी, ३ जून १८३५ (२३३) ; गायकवाड यांच्या मुलुखांत हत्यार वापरण्यास मनाई व शेजारच्या मुलुखांतहि तसा जाहीरनामा काढण्याची गायकवाड याची इंग्रजांना सूचना, रणजितसिंग शीख याची बलकवाल्यांशी लढाई व इंग्रजांची तटस्थता, १५ जून १८३५ (२४७-२४८) ; महंमदअली अर्काटवाला यास चेनापट्टणहून अर्काट येथे जाऊन राहण्याचा तगादा, समुद्रकिनाऱ्यापासून १२ कोसांच्या आंत काळ्या लोकांना येण्यास बंदी, ६ सप्टें. १८३५ (३३९).

राज्यकारभार :

इंदूर येथे होळकर यांच्या फौजेत झालेल्या बंडाच्या पारिपत्यास इंग्रजांच्या मदतीची जरूरी २७ ऑक्टो. १८३४ (१८) ; जिनगर वगैरे जातींना खाण्याचे पदार्थ अथवा कल्हईची भांडी विकण्यास कंपनी सरकारकडून मनाई, लोकांकडे असलेल्या बाजीराव रघुनाथ याच्या ऐवजाच्या शोधाबद्दल काढावयाचा जाहीरनामा, १६ डिसें. १८३४ (५९-६०) ; इंदूरकडील फौजेवर भिल्लांकडून हल्ला, ७ एप्रिल १८३५ (१६३-१६४) ; जयपूर येथील माजी प्रधान जोतराम याची रिसाल्यावर व मिसन सरदाराची जमाबंदीच्या कामावर नेमणूक, १२ मे १८३५ (२००) ; बाबाजी सुभेदार प्रकरणी लॉडविक याजकडून सुभेदारास जबाब, १९ मे १८३५ (२१६).

शहर सुधारणा

पुलापासून साताऱ्यापर्यंत करावयाच्या सडकेसंबंधी रेसिडेंट याची महाराजांशी चर्चा, १९ सप्टें. १८३५ (३४९).

संकीर्ण :

नागपूरकर रघोजी भोसले याचा मृत्यु, २० डिसें. १८३४ (६५) ; नागपूर येथील गुजर अधिकाऱ्याचा मृत्यु, १३ मार्च १८३५ (१३६) ; लखनौकर नबाबाकडून त्याच्या आईची शहराबाहेर हकलपट्टी, १५ जून १८३५ (२४७-२४८) ; तंजावर येथील रेसिडेंट व अधिकारी यांच्याशी वाळिंबे याची भेट, १७ जुलै १८३५ (२९९).

पुडके क्रमांक ४

पत्र क्र. १९१२५, पृष्ठे सं. १-४०५, इ. स. १८३५-३६.

(प्रतापसिंह महाराज सातारकर यांच्या रोजनिशीतील नोंदी, दिनांक १-१०-१८३५ ते १८-१०-१८३६ अखेर)

आर्थिक :

सचिवांच्या धाकटचा मातोश्रींच्या खर्चाबद्दल व राहण्यासंबंधी ठराव, १५ ऑक्टो. १८३५ (१८-१९) ; पर्जन्याने पडलेल्या घरांना तगाई, १८ ऑक्टो. १८३५ (२३) ; अमरसिंग शिर्के यांच्या गांवाची जप्ती, ११ जाने. १८३६ (१४१) ; विलायत येथील बादशहाचे मुखवटचाचा नवा रुपया मुम्बईत पाडला तो पलटणीचें खर्चात व बाजारांत चालविण्याबाबत, ३१ जाने. १८३६ (१६६) ; सिरनादगी येथील पाटील व रयत परांगदा झाल्यामुळे व अवर्षणामुळे इस्तावाचा करार, मैनाबाई डफळे हिजकडून सनदी शिपायास जमिनी व नक्त नेमणुकी, दसऱ्यानिमित्त मुजुमदार यांस शेला पागोटे, उमराणीकर डफळे यांजकडील कृष्णाजी बल्लाळ मोडक यांचे कर्ज, १ फेब्रु. १८३६ ते २ फेब्रु. १८३६ (१६७–१७४) ; सावे या मुतालिकांच्या गांवी तगाई न घेता विहिरी करून केलेल्या बागाईतास पांच वर्षे सारा माफी, २५ फेब्रु. १८३६ (१९९) ; पुलासाठी व प्रतापगडचे रस्त्यासाठी झालेला खर्च, महाराजांचे राज्याभिषेकाकरितां समुद्राचे पाणी आणण्याबद्दल, ९ मार्च १८३६ (२१०–२१३) ; कर्नाटकांतील इंग्रजी मुलुखांत दिलेल्या इनाम गावाकडून रखवालीबद्दल पैसा वसुली, ५ मे १८३६ (२४४) ; नीळकंठ शेषाद्री-अक्कलकोटकर यांची स्त्री, रखवालदार, शिर्के, रंगो बापूजी वगैरे लोकांना पेन्शन देणेबद्दल, २५ जून १८३६ (३०७–३०९) ; बाबाजी पराडकर यास बक्षिसी, रस्ते वगैरेची दुरुस्ती, ३० जून १८३६ (३१३–३१६) ; वसुलासाठीं ठेवलेल्या स्वारांत कपात, पथकांचे खर्च, जनकोजी शिंदे यास बक्षिसी, २८ जुलै १८३६ (३३६–३४६).

किरकोळ :

दिल्लीच्या बादशहाचे आगमन व भेटीबाबत, २६ ऑक्टो. १८३५ (२६) ; जयपूर व उदेपूर येथील ठाकूर लोकांस चोळी, बांगडचा व पगडचा पाठविल्या व सांगितले की लढावयाचे असल्यास पगडचा घाला नाहीतर बांगडचा भरा अशी बातमी, १६ नोव्हें. १८३५ (४६) ; नारायणराव शिंदे यांचे कुटुंबासह यात्रेकरितां गमन, २२ डिसें. १८३५ (९६) ; गोपाळराव शिंदे यांची स्वतःच्या बायकोशी वागणूक, २२ डिसें. १८३५ (१०७) ; बायजाबाई हिचे ब्रम्हावर्त, प्रयाग वगैरे येथे यात्रेस गमन, रणजितसिंग याच्या वकिलाचे ब्रम्हावर्तास गमन, २४ जाने. १८३६ (१५३) ; महिपतराव कदम यांचे ग्वाल्हेर येथे गमन, २४ जाने. १८३६ (१५४) ; रणजितसिंग याचा आजार, २४ जाने. १८३६ (१५५) ; बाळाजीपंत नातू याचा पाचवड येथे मृत्यु, २३, २४, २६ मार्च १८३६ (२२१–२२३) ; इंग्रजांचे हुकूम आले असतांसुद्धां कामे लवकर होत नाहीत म्हणून तक्रार, १९ जून १८३६ (३००-३०१) ; महाराजांनी केलेल्या जहागिरीच्या बंदोबस्तामुळें अक्कलकोटकर यांचे समाधान, शहाजी भोसले यांचा इंग्रजी भाषेचा अभ्यास, ठग लोकांना धरण्याविषयी शिपायांना आज्ञा, १२ जुलै १८३६ (३२४-३२५) ; पुण्याच्या कमी आमदानीबद्दल पुण्यांतील शेटे महाजन व मुसरीफ यास विचारणा, १८ ऑगस्ट १८३६ (३६६).

खाजगी :

(छत्रपति) इंग्रजी पुस्तकांचे मराठीत भाषांतर केले म्हणून नरसिंगराव यास बक्षीस, १३ नोव्हें. १८३५ (४३) ; महाराजांकडून गैरवर्तणुकी घडल्या त्यासाठीं नारायणराव राजाज्ञा यांची नेमणूक, १९ नोव्हें. १८३५ (४८) ; बाळाजीपंत किबे यांच्या कण्हेरखेड प्रकरणी महाराज सरकारची माफी मागणी, २५ डिसें. १८३५ (११८) ; नीरेच्या दक्षिणेकडील सचिवाचा मुलूख हा महाराज

दप्तर क्रमांक ४२, पुडके क्रमांक ४—चालू

खाजगी : चालू—

सरकारच्या राज्याचा भाग, २६ जाने. १८३६ (१५८) ; अक्कलकोटकर शहाजी भोसले यांच्या लग्नाचा खर्च, ३१ जाने. १८३६ ते १५ फेब्रु. १८३६ (१६५–१८५) ; गव्हर्नर व महाराज यांची भेट, लॉट याचे विलायतेहून कलकत्त्यास व नंतर पुण्यास आगमन, सरदेशमुख व अक्कलकोटकर यांचा तंटा, १० मे १८३६ ते १४ मे १८३६ (२५१–२५५) ; राज्यकारभाराची माहिती करून घेण्यासाठी महाराजांनी आपला मनुष्य विलायतेस पाठवावयाचे ठरविले त्यावर रेसिडेंट व महाराज यांचे बोलणे, १९ जून १८३६ (२९५-२९६) ; रस्ते, पूल वगैरेंच्या दुरुस्त्या, स्थगित राहिलेले कुलाचार केल्यावर शहाजी भोसले यांना आरोग्य, १३ जुलै १८३६ (३२६–३२८) ; महाराजांनी सचिवास दत्तक घेण्यास परवानगी देऊन इंग्रजांचा कायदा मोडला असे एल्फिन्स्टिन याचे म्हणणे, गव्हर्नराची नातू यांचे पश्चात भेट, राज्याचा वसूल व बंदोबस्त यासंबंधी, ७ ऑगस्ट १८३६ (३५४–३५७) ; उदेपुराहून राणाजी याने कोंडाराम व रघुनाथसिंग यांचेबरोबर महाराजांकडे पाठविलेली जवाहीर, हत्ती, घोडे, तलवार, ढाली वगैरे भेट, २४ ऑगस्ट १८३६ (३७१);

छत्रपती व रेसिडेंट संबंध :

महाराज व रेसिडेंट लाडविक यांनी सचिवाचे खटले मिटविण्याबाबत, ६ ऑक्टो. १८३५ (५) ; रामराव डफळे यांचे मृत्यूनंतर त्यांचे वतन बायकोकडे चालवावे म्हणून रेसिडेंट लॉडवीक यांचे सांगणे, १५ ऑक्टो. १८३५ (१५) ; रेसिडेंट लाडवीक यांची, महाराजांशी नीट वागावे म्हणून सचिवास विनंती, १७ ऑक्टो. १८३५ (२२) ; इंग्रजी राज्य बुडविण्याबाबत महाराज आप्पासाहेब व सेनापती एकत्र येऊन कारस्थाने करतात या अफवेबाबत महाराजांनी रेसिडेंट यांस केलेला खुलासा, ९ डिसें. १८३५ (६९) ; रेसिडेंट लॉडवीक यांचे शहाजी भोसले यांचे लग्नाविषयी तोरगलकर शिंदे यांचेशी बोलणे, २८ डिसें. १८३५ (१२०) ; रेसिडेंट व महाराज यांची रस्त्यावर पूल बांधण्याविषयी चर्चा, २८ डिसें. १८३५ (१२१) ; बाल्याबा याच्या लग्नाच्या आमंत्रणासंबंधी रेसिडेंट लॉडवीक याने केलेल्या तक्रारीचे निरसन, १ मे १८३६ (२४१) ; रेसिडेंट लॉडवीक व सेनापती यांचे बोलणे, शाहू महाराजांच्या बहिणीचे लग्नास झालेल्या २० हजार रुपये खर्चाबाबत जॉन्सन साहेब याची विचारणा, शिवाजी महाराज रजपूत लोकांशी शरीरसंबंध करू पहात आहेत म्हणून लाडविक याचे म्हणणे, ७ सप्टें. १८३६ (३८२–३८५) ;

छत्रपतींचे नित्याचे व्यवहार :—(खालील पृष्ठांची २ ऑक्टो. १८३५ ते १८ ऑक्टो. १८३६ ही तारीख आहे.)

आर्थिक :

३०, १४४, १७५, १७६, १८१, १८२, १८३, १८६, १८७, १८९, २०३—२०७, २३६.

खाजगी :

१२, १४, २१, २४, ३३, ३४, ३८, ४०, ४१, ४९, ५०, ५२, ५८, ६५, ६८, ७२, ७३, ७४, ८४, ९०, ११९, १२३, १२४, १२८, १२९, १३८, १४२, १४९—१५२, १५६, १५७, १५९, १६२, १७८, १९८, २०२, २०८, २०९, २१५—२१७, २२०, २३०, २३४, २४३, २४६, २६४, २६५, २६६, २६७, २८०, २८८, २९३, २९४, २९७—२९९, ३०४, ३११, ३२३, ३३३, ३३४, ३४७, ३६८, ३६९, ३७३, ३७५, ३७८, ३९९, ४००.

धार्मिक व सामाजिक :

६, २२९, २४२, २५०, २७१, २७२, २८७, ३५३.

नित्यनियम :

२, ३, ११, २०, २५, ३६, ३७, ३९, ४२, ४४, ४७, ५१, ६३, ६४, ६६, ६७, ७५, ७६, ८१, ८३, ८९, ११७, १२५, १२७, १३०, १३५, १४३, १४५, १६३, १६४, १७७, १८०, १८४, १९६, १९७, २००, २१४, २१८, २२७, २२८, २३१—२३३, २३५, २३८—२४०, २४५, २४९, २७६, २८१, २८४—२८६, २८९, २९१, २९२, ३०२, ३०५, ३०६, ३१०, ३१२, ३१७, ३१८, ३२१, ३२९—३३२, ३३५, ३५०, ३५१, ३५८, ३६२, ३६७, ३७०, ३७२, ३७४, ३७७, ३७९—३८१, ३८६—३८९, ३९१—३९४, ३९६—४०५.

दप्तर क्रमांक ४२, पुडके क्रमांक ४—चालू

राज्यकारभार :

९, १०, १६, १७, २७, २९, ३२, ५५, ६१, ६२, ७०, ७७, ८५, ८७, ९१, ९२, ९४, ९५, ९७, ९८, १०१--१०६, १०८--११०, ११२--११५, १३६, १३७, १३९, १४०, १६०, १६१, १७९, १९०--१९५, २१९, २२६, २४८, २६३, २६८--२७०, २७३--२७५, ३०३, ३१९, ३२०, ३२२, ३४८, ३५२, ३६०, ३६१, ३७६, ३९०, ३९५.

सुधारणा वगैरे :

४५, ७१.

सरंजाम इनाम जहागिरदार वगैरे :

५६, ५७, १२६, १४७, १४८, २०१, २४७.

स्वार, शिबंदी वगैरे :

५४, १८८.

शीवतंटे, कजिया वगैरे :

७, ८, ७८, ७९, ८८, ३५९.

जहागिरदार :

(सातारा राज्यातील)—सिमोल्लंघन कार्यक्रम, रामराव डफळे यांचा मृत्यु, १ ऑक्टो. १८३५ (१); बाळाजीपंत नातू व लाडविक यांची भेट, ५ ऑक्टो. १८३५ (४); शिर्के, शिंदे व सचिव यांचे खटले व त्यांचा बंदोबस्त, २७ नोव्हें. १८३५ (६०); शिंदे व त्यांच्या स्त्रिया यांजकडून जामीन कतब्याची मागणी, २८ डिसें. १८३५ (१२२); मैनाबाई डफळे यांचा मृत्यु व त्यांच्या जहागिरीची व्यवस्था, ५ जाने. १८३६ (१३१); शिर्के प्रकरणी खटला, ५ जाने. १८३६ (१३२—१३४); वेणूबाई व कृष्णाबाई सुमंत यांचे पति वारल्यामुळे त्यांच्या जहागिरीची जप्ती, १५ जाने. १८३६ (१४६); धारवाडचे साहेब यांचेकडून करवीरकर नरगुंदकर, व रामदुर्गकर याखेरीज बाकी सर्व जहागिरदारांची चौकशी, २४ एप्रिल १८३६ (२३७).

धार्मिक व सामाजिक :

सतीची चाल बंद करण्याबद्दल महाराजांचे विचार, १३ ऑक्टो. १८३५ (१३); भवानी व महाकाली या दोन तलवारींचे देवघरांत नित्य होणारे पूजन, शिवाजी महाराज यांनी गोवलकर सावंत याचेकडून ३०० रुपयास घेतलेल्या भवानी तलवारीचे पाणी पिण्याने सुलभ प्रसुति अनुभव, २७ मार्च १८३६ (२२४), (२२५); डफळे यांनी लेकीचे लग्नासाठीं घेतलेले कर्ज, मद्रास येथें जकात माफी, महाराजांचे मुलुखांत यणारी साठ हजार रुपये जकात माफ केल्यास स्वस्ताई होऊन साऱ्यांचेच नुकसान होण्याची भीति, १६ मे १८३६ (२५९-२६२); कानपूरचे छावणीतील पगार वाटप करणाऱ्या कारकूनाने केलेली ५०,००० रुपयाची अफरातफर, रणजितसिंग याची उदार वर्तणूक, हिंदु स्त्रियांच्या पुर्नविवाहाचा विचार, पांडुरंगराव शितोळे यांस अक्कलकोटकर यांनी दिलेला पारनेर भागांतील सरंजाम, २३ मे १८३६ ते २६ मे १८३६ (२७७—२७९); कोकणांत एका स्त्रीस सती जाण्यास इंग्रजांकडून परवानगी, १२, १३, १५ ऑगस्ट १८३६ (३६३—३६५).

परदेशी बातम्या :

आक्रमक रशियन सरकारास विरोध करण्यासाठी ब्रिटीशांनी केलेली आरमार वाढ, १, २ जून १८३६ (२८२-२८३).

दप्तर क्रमांक ४२, पुडके क्रमांक ४—चालू

भारतीय संस्थाने :

अक्कलकोटकर यांनी दिलेल्या नेमणुकी, १५ डिसें. १८३५ (८०) ; नागपूरकर भोसले व इंग्रजी वकील यांचा तंटा, स्वार शिबंदी लोकांस रोजमुरा दिला नाही त्यामुळे झालेल्या बंडाचा बंदोबस्त, १६ डिसें. १८३५ (८२) ; जनकोजी शिंदे यांच्या कण्हेरखेड या इनाम गांवाचा कजिया, २२ डिसें. १८३५ (९३—९९).

राजकीय :

शिवाजी महाराज व बादशहाची भागानगर येथे झालेली भेट, आलमगीर बादशहाने केलेली संभाजीची बाटवणूक यांचे उल्लेख, २६ ऑक्टो. १८३५ (२८).

राज्यकारभार :

इंग्रज वकिलाने बडोदा येथे लांच घेतल्याची चौकशी, २७ ऑक्टो. १८३५ (३१) ; इंग्रज वकिलाच्या नोकरीतील ब्राह्मणांची बडतर्फी, १ नोव्हें. १८३५ (३५) ; कोरेगांव येथील बंडखोर पाटलास स्वार पाठवून कैद, २१ नोव्हें. १८३५ (५३) ; दौलतराव शिंदे यांच्या वेळच्या कायद्यानुसार रेसिडेंटकडे बंदोबस्ताचे काम, १७ डिसें. १८३५ (८६) ; जनकोजी शिंदे यांचे गांवांतील बंडखोर लोकांना इंग्रजी सरकारांतून ताकीद, २२ डिसें. १८३५ (१११) ; महाराज सरकार व इंग्रज सरकार यांची सरहद्दीवरील वाद, राज्यकारभारासंबंधी योजना, १५ मे १८३६ (२५६—२५८) ; खंडोपंत यांचे बंडासंबंधांत हरिराव होळकर यांनी गणपतराव व हरिकचंद यांची गव्हर्नर जनरलकडे केलेली पाठवणी, गव्हर्नर, ग्रँट व महाराज यांची जमाबंदीबाबत भेट, १४ जून १८३६ (२९०) ; गंगाधर शास्त्री यांचेमुळे गायकवाड व इंग्रज सरकार यांच्यांत वांकडे आल्याकारणाने इंग्रज त्यांचा मुलुख जप्त करणार म्हणून बातमी, बेनीरामानी दहा लक्ष रुपयाचा मुलुख सोडवून आणल्यास त्यांस चार लक्ष रुपये देण्याचा गायकवाड यांनी केलेला करार, ही रक्कम गायकवाड यांनी न दिल्याकारणाने इंग्रजांकडे तक्रार, ३० जुलै १८३६ (३४९).

सातारा सुधारणा :

सडका व घाट यांच्या कामाची पहाणी, २३ डिसें. १८३५ (११६).

स्वार, शिबंदी, तोफखाना इतर :

महाराज सरकारकडील फौजेच्या बंदोबस्ताविषयी जनरल यांनी केलेली चौकशी, २६ नोव्हें. १८३५ (५९).

पुडके क्रमांक ५

पत्र. क्र. १९१२६, पृष्ठे सं. १—२२६, इ. स. १८३६–३७

(प्रतापसिंह महाराज सातारकर यांच्या रोजनिशीतील नोंदी १९ ऑक्टो. १८३६ ते ८ ऑक्टो. १८३७ अखेर)

आर्थिक :

जमाबंदीचा तपशील, ४ जून १८३७ (१५७—१५९).

किरकोळ :

रॉबीनसन याची भेट घेण्याची जनरल स्मिथ याची इच्छा, १२ नोव्हें. १८३६ (१०) ; रेसिडेंट लॉडवीक याच्या नातेवाईकांची अरेरावी, १५ डिसें. १८३६ (३३) ; करंज्याजवळील रस्त्यास ओढ्यावर पुलाचे बांधकाम, ९ फेब्रु. १८३७ (६८) ; नहराजवळील सरकारचा बंगला पाडण्यासंबंधीचा वाद, २ मे १८३७ (१३८).

दप्तर क्रमांक ४२, पुडके क्रमांक ५—चालू

खाजगी :

स्वत:वरील खोटया आरोपांचे निराकरण व राज्य सरकारातील अंतस्थ कलह यावर तोड काढण्यास स्वत:चा दूत विलायतेस पाठविण्याची महाराजांची योजना, २८ मार्च १८३७ (१०४—१०९).

छत्रपति व रेसिडेंट :

